# “वर्धा तालुक्यातील स्वातंत्र्य चळवळीत महिलांच्या राजकीय
# व सामाजिक सहभागाचे विश्लेषणात्मक अध्ययन.”
**(१९२० ते १९४७)**

# SUMMARY

**- Submitted to the -**

**University Grants Commission**
**Western Regional Office, Pune - 411007**

**- For the Completion to -**

## Minor Research Project
## In
## Political Science

**- Submitted By -**

*Dr. V.R. Bobde*

*Principal Investigator*

---

**DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE**
**Yeshwant Mahavidyalaya, Wardha -442001**
**MAHARASHTRA**

**March -2017**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण |
|---|---|
| १. | प्रस्तावना |
| २. | भारतीय स्त्री-जीवन |
| ३. | वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्यांची चळवळ आणि स्त्रिया |
| ४. | महात्मा गांधींचे तत्वज्ञान आणि स्त्रिया |
| ५. | असहकार व संविनय कायदेभंग चळवळीत महिलांचा सहभाग |
| ६. | वैयक्तिक सत्याग्रह व भारत छोडो आंदोलनातील महिलांचा सहभाग |
| ७. | मूल्यमापन व निष्कर्ष |
| | ▪ संदर्भ ग्रंथ सूची |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## ▪ पार्श्वभूमी :

ब्रिटीश सत्तेविरुद्ध लढण्याच्या अभिनव मार्गाचे प्रात्यक्षिक स्वातंत्र्य चळवळीने जगासमोर सादर केले. हातात शस्त्र न घेता प्रबळ सत्तेविरुद्ध यशस्वीरित्या लढता येते, हे भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाने जगाला दाखवून दिले. त्यामुळे जगाच्या निरनिराळ्या भागातील दडपल्या गेलेल्या मानवी समाजाला जुलूम व अन्यायाविरुद्ध लढण्याचे एक नवे तंत्र यामधून शिकायला मिळाले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे आणखी एक विशेष महत्वाचे वैशिष्टय म्हणजे भारतीय महिलांचा स्वातंत्र्य चळवळीत उत्स्फूर्त आणि उत्साहपूर्ण सहभाग होय. सभा, संमेलने, चर्चा, निदर्शने, निरोधने, प्रचार यामध्ये महिला आघाडीवर होत्या. परिणामस्वरुप महिलांचा आत्मविश्वास, आत्मभान, नेतृत्वगुण विकसित होऊ लागले. त्यांच्या सामाजिक व राजकीय जाणिवा जागृत झाल्या. व्यापक राजकीय, सामाजिक दृष्टिकोन त्यांना प्राप्त झाला. स्वातंत्र्याच्या चळवळीतील या महिलांच्या सहभागामुळेच पुढच्या राजकारणात महिलांनी सहभागी होणे, मतदानाचा हक्क आणि इतर संवैधानिक हक्क मिळण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यास स्वातंत्र्याची चळवळ विशेष महत्वाची ठरली. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याच्या चळवळीतील महिलांच्या राजकीय व सामाजिक सहभागाचे विश्लेषणात्मक अध्ययन महत्वाचे आहे.

## ▪ वर्धा जिल्हा :

भारतातील स्वातंत्र्य चळवळीत वर्धा जिल्ह्याचे स्थान अनन्यसाधारण आहे. वर्धा जिल्ह्यातील महिलांचा स्वातंत्र्य चळवळीत राजकीय व सामाजिक सहभाग मोठ्या प्रमाणात राहीला आहे. याचे कारण वर्धा - सेवाग्राम, पवनार ला महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांनी आपली कर्मभूमी आणि तपोभूमी बनविली होती. त्यांनी येथूनच स्त्रियांमधील सुप्त शक्तींना वाव देण्यासाठी स्त्रीविषयक दृष्टिकोन संपूर्ण देशवासियापुढे मांडला. त्यामुळेच स्त्रिया राजकीय जीवनात आणि चळवळीत मोठ्या संख्येनी उतरल्या.

महात्मा गांधी १९३४ साली वर्धा येथे आल्यानंतर भारताचे भवितव्य घडविणारे अतिशय महत्वाचे निर्णय येथेच घेण्यात आले. वर्धा सेवाग्राम शांततामय युद्धतंत्राची सिद्धता येथूनच केली. 'भारत छोडो' हे घोषवाक्य ठरलेला ठराव सुद्धा १४ जुलै १९४२ रोजी कॉंग्रेस कार्यकारिणीसमोर वर्धा येथेच पारित करण्यात आला. त्यामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चा व निर्णय घेण्याचे केंद्र म्हणून वर्धा जिल्ह्याचे स्वातंत्र्य चळवळीतील स्थान केंद्रस्थानी होते.

महात्मा गांधींचा स्त्री जातीवर जास्त विश्वास होता. त्यांच्या मते पुरुष स्त्रियांशी कधीच बरोबरी करु शकत नाही. कारण निस्वार्थ सेवा भावाचा गुण हा स्त्री वर्गात निसर्गतःच प्राप्त झालेला आहे. दुःख पाहताच विरघळणारे करुणामय अंतःकरण स्त्री जातीचे असते. स्त्री व पुरुष या दोहोमध्ये स्त्री जात अधिक थोर आहे. कारण आज देखील आत्मबलिदानाची मूक सहनशक्तीची, श्रद्धेची व ज्ञानाची ती मूर्ती आहे. अशा शब्दात महात्मा गांधींनी स्त्रियांना मानसन्मान दिला. त्यामुळे स्वातंत्र्याची चळवळ ही पुरुषांपूरतीच मर्यादित न राहाता स्त्रियांनाही सहभागी करुन घेणारी ही चळवळ महत्त्वपूर्ण ठरली आहे.

सौ. दमयंतीबाई धर्माधिकारी व सौ. शरयुताई धोत्रे यांना वैयक्तिक सत्याग्रहाची परवानगी महात्मा गांधींनी दिली. जानकीदेवी बजाज मालतीबाई थत्ते, गंगुबाई वाळूजकर, वैणूताई चौधरी, यमुनाताई पाटील, कलावतीबाई नागपूरे, पार्वताबाई मानकर, सिताबाई मांजरे अशा असंख्य जिल्ह्यातील महिला या चळवळीत मोठ्या संख्येनी सहभागी झाल्या. त्या काळात होणाऱ्या सभेमध्ये, संमेलनात, चर्चेत, निदर्शनात, प्रचारात, निरोधने करण्यात त्याचा सहभाग प्रभावी होता.

स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा राजकीय व सामाजिक सहभाग आजही महिलांना प्रेरणादायी ठरणारा आहे. असे असतानाही जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या राजकीय व सामाजिक सहभागाचा संशोधनात्मक दृष्टिकोनातून अभ्यास झालेला दिसत नाही. देशाला स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतलेल्या अनेक महिला काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. तरीपण द्वितीय स्त्रोताच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या राजकीय व सामाजिक सक्रीय सहभागाची माहिती गोळा करुन त्याचे विश्लेषण व निर्वचन करुन वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा राजकीय व सामाजिक सक्रीय सहभाग आणि महिलांची राष्ट्रीय

अशी मौलिक कामगिरी नव्या पिढीसमोर येईल. म्हणून हे महत्व ओळखूनच संशोधनकर्त्याने वर्धा तालुक्याची निवड करुन प्रस्तुत विषयावर लघू संशोधन प्रकल्पाचे काम करण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे देशातील वर्तमान व भविष्यकाळातील नव्या पिढीतील महिलांना हा लघु संशोधन प्रकल्प स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने दिशादर्शक ठरणार आहे.

- **संशोधन विषयाची उद्दिष्टे :**

१. स्वातंत्र्य चळवळीत महिलांचा मोठ्या संख्येनी सहभाग वाढण्यासाठी महात्मा गांधींची प्रेरणा कारणीभूत ठरली, याचा शोध घेणे.

२. महिलांनी स्वातंत्र्य चळवळीत पुरुषांच्या बरोबरीत आपली कर्तृत्वक्षमता सिध्द केली याचा अभ्यास करणे.

३. स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या सहभागामुळे महिलांच्या व्यक्तिमत्व विकासाला संधी मिळाली, याचा शोध घेणे.

४. स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा राजकीय व सामाजिक सहभाग सक्रीय होता की नव्हता याचा अभ्यास करणे.

५. समाजाच्या विविध स्तरातील महिला स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या होत्या काय? याचा शोध घेणे.

६. स्वातंत्र्याची चळवळ महिलांमध्ये राजकीय व सामाजिक जाणिवा जागृत करण्यामध्ये परिणामकारक ठरली काय? याचा शोध घेणे.

७. स्वातंत्र्याची चळवळ महिलांमधील आत्मविश्वास, नेतृत्व गुण, आत्मभान निर्माण करण्यामध्ये परिणामकारक ठरली काय याचा शोध घेणे.

८. महिला सक्षमीकरणासाठी स्वातंत्र्याची चळवळ प्रेरणादायी ठरणारी आहे किंवा नाही हे समजून घेणे.

९. स्वातंत्र्याच्या चळवळीतील स्त्रियांचा सहभाग हा स्त्री शक्तीचा आविष्कार आहे हे समजून घेणे.

१०. स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागामुळे स्त्रियांचा सामाजिक व राजकीय दृष्टिकोन व्यापक झाला काय? याचा शोध घेणे

- **संशोधन विषयाची गृहितके :**

१. स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सक्रीय सहभागामुळे स्त्रियांमधील राजकीय व सामाजिक जाणिवा जागृत झाल्या.

२. स्वातंत्र्य चळवळीत महिलांनी पुरुषांच्या बरोबरीने कार्य करुन आपली कर्तृत्वक्षमता सिध्द केली.

३. महिलांचा आत्मविश्वास, आत्मभान, नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत झाली.

४. महिला सक्षमीकरणाची पायाभरणी स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या सक्रिय सहभागामुळे झाली.

- **संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला. स्वातंत्र्य चळवळीनंतर ७० वर्षाचा काळ उलटून गेला असल्यामुळे जिल्ह्यात स्वातंत्र्यचळवळीत सहभागी झालेल्या स्त्रिया आज ह्यात नसल्यामुळे त्यांच्या परिवारातील सदस्यांशी संशोधकाने चर्चा करुन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर संशोधकाने संशोधन विषयाचा अभ्यास प्रामुख्याने सुक्ष्म पातळीवर करण्यासाठी दुय्यम स्त्रोतावर विशेष भर दिला. त्यासाठी जिल्ह्यातील सेवाग्राम येथील ग्रंथालय, आर्वी येथील लोकमान्य ग्रंथालय, महिला आश्रम, वाणिज्य महाविद्यालयातील ग्रंथालय, यशवंत महाविद्यालयामधील ग्रंथालय, राष्ट्रभाषा प्रचार समिती ग्रंथालयाचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले. तसेच शासकीय दस्तऐवज, ठराव, प्रस्ताव, पत्र व्यवहार, कागदपत्रे नियतकालिके यांचा वापर करण्यात आला. त्याचबरोबर स्वातंत्र्य चळवळीत जिल्ह्यातील सक्रिय सहभागी असणाऱ्या पुरुष मंडळी सोबतही चर्चा, त्यांचे अनुभव त्यांचे मत विचारात घेऊन पडताळणी करुन त्याचे विश्लेषण व निर्वचन केले.

- **स्त्री अभ्यासाचे महत्व :**

स्त्री अभ्यास हे केवळ एक सामाजिक शास्त्राचा भाग नसून एकीकडे स्त्रियांच्या दर्जाविषयी स्पष्टीकरण देऊ पाहणारे तर दुसरीकडे त्यांची असमानता घालवण्याचे उपाय आणि त्यांच्या सक्षमीकरणाच्या पद्धती सुचविणारे अध्ययन आहे. स्त्री अभ्यास हा स्त्री व पुरुषांमध्ये जागरुकता आणतो. विकास कामाचे नियोजन व धोरण निर्धारकांना धोरण निर्णयात स्त्री सहभाग व स्त्री भूमिका समजून घेणे आवश्यक ठरते. एकुणच स्त्रियांचे प्रश्न व त्यांची भूमिका समजून घेणे व त्यांचे विश्लेषण स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून महत्वाचे आहे. आजपर्यंत स्त्री विषयक अभ्यासात अनेक विषय हाताळले गेले. परंतु ' वर्धा तालुक्यातील स्वातंत्र्य चळवळीत महिलांच्या राजकीय व सामाजिक सहभाग या विषयावर संशोधनात्मक असा अभ्यास झाल्याचे दिसत नाही. वास्तविक स्वातंत्र्य लढ्यात या जिल्ह्यातील स्त्रिया आघाडीवर होत्या. त्यांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या आपले कर्तृत्व सिद्ध केले. आणखी विशेष म्हणजे हा जिल्हा महात्मा गांधीची कर्मभूमी, तर आचार्य विनोबा भावेंची तपोभूमी होती. म. गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या विचारधारेनी प्रेरित झालेल्या ज्या स्वयंसेवी संस्था होत्या त्या आजही महत्वाची भूमिका बजावित आहे. यासर्व पार्श्वभूमीवर वर्धा तालुक्यातील स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा राजकीय व सामाजिक सहभाग आणि महिलांची राष्ट्रीय अशी मौलिक कामगिरी नव्या पिढीसमोर आणता येईल याच उद्देशाने संशोधनकर्त्याने प्रस्तुत विषयावर लघु संशोधन प्रकल्पाचे काम केले आहे. त्यामुळे निश्चितच देशातील, जिल्ह्यातील वर्तमान व भविष्यातील नव्या पिढीतील महिलांना हा लघु संशोधन प्रकल्प सक्षमीकरणाच्या दृष्टीने प्रेरणादायी आणि पुढील अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल.

# प्रकरण दुसरे

# भारतीय स्त्री जीवन

## ■ ऐतिहासिक पार्श्वभूमी :

भारतीय स्त्री जीवनाचा इतिहास खऱ्या अर्थाने वेदकाळापासून सुरु होतो. वेदकाळात स्त्रीचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीने होता. प्रत्येक क्षेत्रात ती पुरुषांबरोबर वावरत होती. स्त्रीला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्वातंत्र्य तर होतेच; पण स्वत:च्या जोडीदाराच्या निवडीबाबतही पुरेपूर स्वातंत्र्य होते. समाजाकडून ती सुरक्षित होती. कुटुंबात आणि समाजात तिचा विशेष प्रभाव होता. स्त्रीला आपले बौद्धिक आणि आध्यात्मिक जीवन समृद्ध करण्यासाठी शिक्षणाची संधी उपलब्ध होती. मैत्रेयी, गार्गी ह्या सर्व स्त्रिया बौद्धिकसामर्थ्याच्या किंवा वाक्यचातुर्याच्या आदर्श नमूना होत्या. वेदकाळात स्त्रीचा कुटुंबात व समाजात कसा प्रभाव होता याची साक्ष पुढील उताऱ्यावरुन मिळू शकते. "To women is assign the care of the home. Family being her creation her association with man in every sphere is stressed. Her unassociated individuality is ignored, and she is advised to turn her back on it even to the total suppression of what may be her individual spiritual need, within the name her influence has been much greater than alien observers imagine, when circumstances have drawn her outside the home to high duties , she has shown capacity, courage and strength."

यावरुन असे लक्षात येते की, वेदकाळात स्त्री ही स्वतंत्र होती. तिचा दर्जा पुरुष समाान होता.

## ■ मध्य युगीनकाळ :

मध्ययुगीन काळात मात्र वेदकाळातील स्त्रीचे स्वातंत्र्य संपुष्टात आले. केशवपन, सतीप्रथा, विधवेचे जीणे अशा कुप्रथांची कळी म्हणजे स्त्री होती. स्त्रियांच्या बौद्धिक विकासात त्यांच्या पतनाला, दुय्यम स्थानाला जबाबदार असा हा काळ होता.

" पिता रक्षती कौमारे भर्ता रक्षती यौवने ।
रक्षन्ति स्थाविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्य महंती ।। " ६-३

अशी अवस्था होती. स्त्रीची होत असलेली अवनती यांनतर इतक्या पराकोटीला पोहचली की, स्त्री मनाने, बुद्धिने, शरीराने, विचाराने पूर्णपणे पुरुषाची दासीच बनली. या काळात पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ अशी प्रथाच पडली होती.

- **शिवकाल :**

शिवाजी महाराजांच्या काळात स्त्रियांकडे आदराने पाहिल्या जात होते. राजमाता जिजाबाईचा आदर्श लौकिक त्या काळात स्त्रियांपुढे होता. शिवकाळात स्त्री विषयक बंधनांना थोडे शिथील करण्यात आले होते.[८] शिवाजी महाराजांचे गुरु समर्थ रामदास स्वामी यांचा दृष्टिकोण स्त्रियांना अधिक अनुकूल होता. "समर्थांनी अनेक स्त्रियांना अनुग्रह देऊन परमार्थ प्राप्तीचा मार्ग खुला करुन दिला. वेणाबाई, अंबिकाबाई या शिष्यीणींना समर्थांनी अनुक्रमे मिरज व वाळवे आणि शिवडे येथील मठांच्या अधिपती म्हणून नेमले होते.

- **पेशवाईचा काळ :**

पेशवाईच्या काळात स्त्री जीवनातील अगतिकतेने तर कळसच गाठला, ब्राह्मण म्हणजे सर्व श्रेष्ठ, त्यांना सर्व अधिकार, इतरांना मात्र अधिकाराच नाही. अशी स्थिती होती. स्त्रियांच्या शिक्षणावर बंदी होती. स्त्रिया बंदिस्त जीवन जगत होत्या. वेदाध्यायन, धार्मिक संस्कार ज्ञानादीपासून या काळात स्त्रीला वंचित ठेवले होते. ब्राह्मणी धर्मात कर्मकांडाचा सुळसुळाट होता. बालविवाह, केशवपन, सतीप्रथा, बालजरठ विवाह यासारख्या अनेक कुप्रथा प्रचलीत होत्या. स्त्रीला निर्बुद्ध समजून तिला पशुतूल्य वागणूक या काळात दिली जात होती. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्ध म्हणजे भारतातील अंधारयुगच म्हंटले जावे असा हा काळ होता.

- **१९ वे शतक आणि स्त्रिया :**

इ.स. १८१८ ला पेशवाईची अखेर होऊन ब्रिटिश राजवटीचा अंमल सुरु झाला. ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्यवादाची पाळेमुळे अधिक खोलवर कशा पद्धतीने रुजवता येईल. या दृष्टीने राज्यकारभार करण्याची त्यांची नीती होती. त्यासाठी या देशातील लोकांना खुश कसे करता येईल आणि भारतीय जनतेत आपल्याप्रती असंतोष निर्माण होणार नाही याची सावधगिरी बाळगून ब्रिटिश आपले राजकारण करुन लागले. त्याच काळात सामाजिक विषमता शिगेला पोहचली होती. स्त्रियांना तर अतिशय हिनतेचे जीणे जगावे लागत होते. आपण पुरुषांच्या

आधाराशिवाय जीवन जगू शकत नाही हा आत्मविश्वास स्त्रियांनी गमावला होता. परंतु याच काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी ज्या शिक्षण संस्था सुरु केल्या त्यामधुन पाश्चात्य विचाराचे वारे वाहायला सुरुवात झाली. त्या शिक्षण संस्थांमधून शिक्षण घेणाऱ्या तरुण पिढीवर त्या विचारांचा प्रभाव पडुन त्या प्रभावाने प्रेरित होऊन सामाजिक परिवर्तनवादी विचारांचे वारे वाहून लागले. येथूनच सामाजिक प्रबोधनाला सुरुवात झाली.

- **पश्चिमेतील स्त्री विचार प्रवाह :**

सन १७९२ मध्ये मेरी वोल्स्टोन क्राप्टने (Marry Wollston Craft), 'ए विंडिकेशन ऑफ दी राईट्स ऑफ वुमन' हा ग्रंथ प्रसिद्ध करुन स्त्री स्वातंत्र्याची वाट मोकळी केली. तत्कालीन स्त्रीत्व हे गुलामगिरीचे दुसरे रुप असून स्त्रीने या गुलामगिरीतून स्वतंत्र होण्याची गरज वोल्स्टोन क्राप्टने प्रतिपादित केली. पुरुष हा विचारप्रधान तर स्त्री ही भावनाप्रधान, पुरुष हा विवेकी तर स्त्री ही विकारी यासारख्या स्त्री विषयीच्या साचेबंद पारंपारिक कल्पना वोल्स्टोन क्राप्टने नाकारल्या व पुरुषांप्रमाणेच स्त्री हा विचारक्षम आणि विवेकी जीव असून ज्या विचारक्षमतेच्या आधारावर पुरुषांच्या हक्काचे समर्थन होऊन ते अधिकार पुरुषांना दिले जातात. त्याच प्रकारे स्त्रियांनाही सर्व नागरिकत्वाचे अधिकार मिळाले पाहिजे असे तिने सांगितले. तिच्या मते जगामध्ये स्त्रियांना आज दान नको आहे तर, त्यांना न्याय हवा आहे.

स्त्री मुक्तीच्या चळवळी आणि स्त्रीवादी दर्शन हे महायुद्धोत्तर कालखंडात उत्कटतने अवतरले असले तरी स्त्री मुक्तीचा विचार व्यक्तिस्वातंत्र्याच्या अंगाने युरोपीय प्रबोधन परंपरा व एकोणविसाव्या शतकातील उदारमतवादी तत्त्व विचारांच्या कुशीतच अंकुरित झाला उदारमतवादी विचारसरणीने मनुष्य हा विचारक्षम आणि विवेकशील जीव आहे असे प्रतिपादन केले.

- **स्त्री स्वातंत्र्याची चळवळ :**

इ. स. १८१८ पर्यंत परंपरेनुसार चालत आलेले जूने विचार तग धरुन होते. ते अगदी बुरसटलेले, भिजलेले विचार होते. अशा काळात पाश्चिमात्यांचा नवा विचार घेऊन महाराष्ट्रातील तत्वज्ञान विचार जागृत होऊ लागला. या तत्वज्ञान विचारांच्या व्यापकतेने नवी दिशा, नवा विचार घेऊन तरुण समाज सुधारकांची पिढी तयार झाली. तिने पाश्चात्य विचारांचे

स्वागत केले. त्यांनी आपली लेखनी जनजागृतीसाठी वापरली. सर्वप्रथम त्यांना सर्व बाजूंनी उपेक्षित असलेली स्त्री दिसली. धर्माच्या नावावर तिच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या जाचातून तिला मुक्त केले पाहिजे याची त्यांना जाणीव झाली. या जाणिवेतूनच समाजसुधाकरकांनी समाज सुधारणेचे व्रतच घेतले. यांची सुरुवात बंगाल मधून झाली. राजाराममोहन रॉय यांनी आपल्या प्रयत्नामुळेच सन १८२१ मध्ये सतीबदी कायदा अस्तित्वात आणला. नवीन धर्मसंस्था व धर्मसंप्रदाय यांची गंगोत्री ठरणाऱ्या ब्राम्हो समाजाची स्थापना १८२८ मध्ये केली.

नवी सामाजिक व राजकीय चळवळ ज्या व्यापक पायावर उभी राहणे आवश्यक होते. तो पाया तयार करण्यासाठी राजाराममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी, न्या. रानडे, दादोबा पांडुरंग, बाबा पद्ममनजी, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, म.फुले, सावित्री फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांनी स्त्री-पुरुष समानतेसाठी फार मोठी मोहीम हाती घेतली. स्त्री-शिक्षण, स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्याच्या कार्यात या सुधारकांचे फार मोठे योगदान आहे. स्त्री मुक्तीचा, स्त्री सक्षमीकरणाचा पाया घालण्यामध्ये म.फुल्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे स्त्री जीवनाशी संबंधित अशा अनेक प्रश्नांसंबंधी सुधारणावादी कायदे झाले. याच काळात स्त्रियांचे प्रश्न लेखन साहित्यातून मांडायला सुरुवात झाली. बाळशास्त्री जांभेकरांचे १८३२ मध्ये सुरु झालेले दर्पण पाक्षिक, प्रभाकर वृत्तपत्र, विष्णूशास्त्री पंडित यांनी स्त्रियांच्या संदर्भातील सामाजिक सुधारणांबाबत लेख लिहून पुनर्विवाह, स्त्री-शिक्षण इत्यादी प्रश्नांना वाचा फोडली. लोकहितवादीच्या 'शतपत्रातून' स्त्री विषयक प्रश्नांना चालना मिळाली. १८६५ मध्ये 'विधवा विवाह' हा ग्रंथ ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी लिहीला. बाबा पद्मनजी यांनी 'यमुना पर्यटन' ही कादंबरी लिहून स्त्री प्रश्न समाजासमोर ठेवला तर ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' या नावाची पुस्तिका १९८२ मध्ये लिहून स्त्रिया ह्या पुरुषांच्या बरोबरीच्या असतात हे उदाहरणांनी सिध्द करुन देऊन त्यांना कमी लेखण्याचा समाजाला अधिकार काय? असा खडा सवाल केला. समाज सुधारणेच्या कार्यात पुरुष समाजसुधारक जरी अग्रणी असले तरी पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे इ. उच्चशिक्षित स्त्रियांचे भरीव योगदान राहीले. स्त्रियांच्या प्रत्यक्ष सहभागामुळे शारदा सदन, आर्य महिला समाज, सेवा सदन, लेडीज

होम क्लास, हिंद सेविका संघ याद्वारे स्त्री शिक्षणाच्या व स्त्री उन्नतीच्या कार्याला संस्थापक रुप प्राप्त झाले. त्याचबरोबर मानव धर्म सभा (१८४४), परमहंस मंडळी (१८५०), प्रार्थना समाज (१८६७), सत्यशोधक समाज (१८७३) यासारखे पंथ उदयास येऊन सामाजिक सुधारणेच्या चळवळीत या पंथाची भूमिका महत्वाची राहिली आहे.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कोल्हापूरचे राजर्षी शाहू छत्रपती यांनी मुलींकरिता शाळा सुरु करुन त्यांना मोफत शिक्षण देण्याची सोय केली. याच शतकाच्या शेवटी विठ्ठल रामजी शिंदे व त्यांची बहीण जनाबाई यांनी बहुजन समाजातील स्त्रियांच्या शिक्षणासाठी अपार कष्ट सोसले, पदरमोड केली. महर्षी कर्वे यांनी हिंगण्यात मुलींच्या शिक्षणाची विशेषत: अनाथ विधवा मुलींच्या शिक्षणाची सोय केली. इ.स. १९१६ साली शेठ विठ्ठलदास ठाकरसी यांच्या मदतीने कर्व्यांनी महिला विद्यापीठाची स्थापना केली. भारतातून शिक्षणाकरिता परदेशी जाणाऱ्या पहिल्या महिला डॉ. आनंदीबाई जोशी व पंडिता रमाबाई ह्या महाराष्ट्राच्याच रहिवासी, सीताबाई आजगावकर ह्या वकीलीची पदवी इंग्लडमधून घेऊन येणाऱ्या पहिल्या भारतीय महिला, डॉ. इरावती कर्वे, कमला देशपांडे, कु. परांजपे आदि महिला पहिल्या महायुद्धानंतर परदेशी जाऊन शिक्षण घेऊन आल्या. १९ व्या शतकात खऱ्या अर्थाने शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात स्त्रीचे व्यक्तिमत्त्व उमलू लागले. तिला आपल्या शक्तीची जाणीव होऊ लागली.

स्त्रियांमधील सुप्त शक्ती जागृत करण्यासाठी खरी नस जर कोणी पकडली असेल तर ती महात्मा फुल्यांनी. ती नस म्हणजे शिक्षण. संपूर्ण सामाजिक बंधनातून स्त्रीला मुक्त करायचे असेल, तिला स्वातंत्र्य बहाल करायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे म. फुल्यांनी ओळखले होते. त्यामुळे इतर स्त्री प्रश्नांना जरी महात्मा फुल्यांनी हात घातला असेल तरी स्त्री शिक्षण क्रांतीचे अग्रदुत म्हणूनच म. फुल्यांना ओळखले पाहिजे. स्त्री सक्षमीकरणाचे तेच खरे मर्म आहे.

- **स्वातंत्र्याची चळवळ आणि म. गांधी :**

सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा असा जेव्हा प्रश्न निर्माण झाला तेव्हा लोकमान्य टिळकांनी राजकीय सुधारणा आधि म्हणून स्वातंत्र्य आंदोलनाला विशेष महत्व दिले. त्यामुळे स्त्रियांच्या प्रश्नांपेक्षाही राजकीय सुधारणेला महत्व प्राप्त झाले. त्यामध्ये स्त्री आणि त्यांचे

प्रश्न मागे पडले. जेव्हा भारतीय राजकारणात महात्मा गांधींचा प्रवेश झाला तेव्हा कॉंग्रेसच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग अतिशय तुरळक व प्रतिकात्मक स्वरुपाचा होता. स्त्री शिक्षण, कुटुंबातंर्गत अत्याचार व दुष्ट रुढींना विरोध या प्राथमिक पातळीच्या पुढे सरकरलेला दिसत नव्हता. अर्थात तोपर्यंत केवळ समाज धुरिणांमध्ये आणि वरिष्ठ सामाजिक वर्तुळामध्ये साधक बाधक चर्चेचा विषय ठरलेली स्त्री समस्यांचा विषय थेट जनसमुदायामध्येच महात्मा गांधींनी नेऊन ठेवला. त्यांनी स्त्रियांशीच संवाद साधला. कॉंग्रेसजनांच्या घरातील स्त्रिया, आश्रमवासी स्त्रिया, विद्यार्थीनी, महिला मंडळे, जाहीरसभांना आलेल्या स्त्रिया इत्यादीशी प्रत्यक्ष संवाद, भाषणे, पत्र नियतकालीकांमधून लेख, वर्तमानपत्रातून लेखन या विविध मार्गानी स्त्रियांशी संपर्क साधून स्त्रियांमधील सुप्त क्षमतांना फार मोठी संधी महात्मा गांधींनी उपलब्ध करुन दिली. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होणाऱ्या स्त्रियांची संख्या सातत्याने वाढू लागली. स्त्रियांनी सुद्धा पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्याच्या चळवळीत आपली कर्तृत्वक्षमता सिद्ध करुन दाखविली. त्याकारणाने भारतातील स्वातंत्र्याची चळवळ हे आधुनिक भारताच्या इतिहासातील एक अभुतपूर्व पर्व आहे.

म. गांधीच्या विचारात स्त्रियांना सर्वोच्च स्थान होते. कार्यकर्त्यांना उद्देशून गांधीजी म्हणतात-"If the congressmen believe that freedom is the birth right of every nation and individual and they were determined to achieve it, then they should first liberate there women from the evil customs and conventions that restrict, there all sound health growth." या गांधीजींच्या विचारांचा परिणाम म्हणून महाराष्ट्रात आणि जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीत अनेक दाम्पत्यांनी भाग घेतल्याचे दिसून येते. गांधीजी म्हणतात, स्त्रीला अबला म्हणणे ही तिची बदनामी आहे तो पुरुषवर्गाने स्त्री वर्गावर केलेला अन्याय आहे. स्त्रीचे सौंदर्य तिच्या परिश्रमतेत, सुदृढपणात आणि अधिकार शक्तीत दडलेले आहे. याचे तिला भान झाले पाहिजे अशा प्रकारची शिकवण गांधीजींची होती.[२९] म्हणून त्यांनी स्त्रियांना देशप्रेमाची प्रेरणा देऊन त्यांच्यातील सुप्त शक्तींना जागृत केले. त्यामुळे स्त्रिया राजकीय जीवनात आंदोलनात मोठ्या संख्येनी उतरल्या. एवढेच नव्हे तर या क्षेत्रात त्यांनी स्वतंत्र भूमिकाही बजावल्या. आपली कर्तृत्वक्षमता सिद्ध करुन दाखविली. त्यामुळे त्यांच्यामधील

आत्मविश्वास, आत्मभान, नेतृत्व गुणांचा विकास झाला. स्वातंत्र्य चळवळीने स्त्रीला एक नवा दर्जा प्राप्त करुन दिला. नव्या समाजरचनेचा पाया रचण्याचे लोक विलक्षण कार्य या आंदोलनाने केले. त्यामुळे स्वातंत्र्याच्या चळवळीतील स्त्रियांचा सहभाग, कामगिरी वर्तमान व भविष्यकाळातील राजकीय व सामाजिक महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या स्त्रियांना व मुलींना अनुकरणासाठी प्रतिमाने म्हणून निश्चितच महत्वपूर्ण ठरणारे आहे. गांधींच्या प्रेरणेनी एका दीर्घ निद्रावस्थेतून स्त्रिया जाग्या होऊन त्या कार्यरत झाल्या. ती जसा स्वातंत्र्याचा संग्राम होता, तसाच स्त्री शक्तीचा अनोखा आविष्कार देखील होता.

# प्रकरण तिसरे
# वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्याची चळवळ आणि स्त्रिया

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत केल्या गेलेल्या कार्याचा अभ्यास यापूर्वी विविध अभ्यासकांनी केला असला तरी त्यात महिलांनी, विशेषत: वर्धा जिल्ह्यातील महिलांनी केलेल्या योगदानाची साफल्याने घेतलेली नोंद अभावाने आढळते. ती घेतली जाणे अगत्याचे होते. वर्धा जिल्ह्यातील महिलांनी केलेल्या कार्याच्या विविध स्मृती आहेत. त्यांनी पत्करलेला कारावास, प्रबोधनातून केलेली लोकजागृती, राष्ट्रीय चळवळीत पुरुषांच्या बरोबरीने घेतलेला उत्स्फूर्त सहभाग, अन्यायाविरुद्ध समर्थपणे दिलेली झुंज, निर्भिडपणे, क्रांतिकारकांना केलेले सहाय्य हे सर्व आजच्या काळात प्रेरक असलेल्या स्मृती आहेत. इतर जिल्ह्याच्या तुलनेत वर्धा जिल्ह्यातील स्त्रिया मोठ्या संख्येनी आघाडीवर होत्या. सुशिक्षित व अशिक्षित, गर्भश्रीमंत, दरिद्री, भिन्न धर्माच्या, भिन्न जातीच्या, भिन्न संस्काराचा प्रभाव असलेल्या असंख्य स्त्रिया या चळवळीत सहभागी झाल्या होत्या. जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणावरुन तर गावा गावातून स्त्रिया स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी झाल्या होत्या. इतर भागातील स्त्रियांप्रमाणे मागासलेल्या मानल्या गेलेल्या जिल्ह्यातील स्त्रियांनी आपले कर्तृत्व व क्रियाशिलता सिद्ध करुन वर्धा जिल्ह्याचे नाव भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात अजरामर केले. त्याचबरोबर भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत वर्धा जिल्ह्याला विशेष महत्व प्राप्त होण्याचे कारण म्हणजे या जिल्ह्याला महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांनी कर्मभूमी आणि तपोभूमी बनविली.

- **वर्धा जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

१९ व्या शतकात सामाजिक सुधारणेच्या चळवळीत अग्रेसर असलेल्या आणि संपूर्ण भारतात पुरोगामी व प्रगत राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील महात्मा गांधींच्या व आचार्य विनोबा भावेच्या वास्तव्याने पावन झालेला जिल्हा म्हणजे वर्धा जिल्हा होय. प्रशासकीय समस्यांवर उपाय म्हणून १८६१ मध्ये इंग्रजांनी नागपूर आणि सागर नर्मदा प्रदेशातील मराठी व हिंदी जिल्ह्याचा समावेश करणारा सेंट्रल प्रॉव्हिन्सेसवर गव्हर्नरची नेमणूक न करता चीफ कमिशनरची नियुक्ती केली. सन १८६२ पर्यंत वर्धा जिल्ह्याचा हा परिसर नागपूर जिल्ह्याचाच एक भाग होता. पण पुढे इतक्या मोठ्या भूभागावर जिल्हा प्रशासन करणे गैरसोयीचे वाटल्याने १९६२

मध्ये वर्धा जिल्ह्याची निर्मिती करुन त्यांचे मुख्यालय पुलगाव जवळ असलेले कवठा या गावी होते. जिल्ह्याचा कारभार कवठा येथे असलेल्या मुख्यालयातून चालत होता. कवठा या गावातील आरोग्यदृष्ट्या हवामान चांगले नव्हते आणि प्लेगमुळे एका ब्रिटिश अधिकाऱ्याचा मृत्यू झाला म्हणून जिल्हा मुख्यालयासाठी 'पालकवाडी' या गावाची निवड करण्यात आली. सन १८६६ मध्ये जिल्ह्याचे मुख्यालय 'कवठा' या गावावरुन 'पालकवाडी' येथे स्थानांतरीत करण्यात आले. सुरुवातीला या जिल्ह्यास पालकवाडी या नावाने ओळखले जात होते. पण पुढे या शहराला ब्रिटिशांनी वर्धा हे नाव दिले. त्यनंतर मात्र या जिल्ह्याला पालकवाडी ऐवजी वर्धा जिल्हा याच नावाने ओळखले जाऊ लागले.

- **वर्धेला महात्मा गांधीचे आगमन :**

सविनय कायदेभंग आंदोलनासाठी साबरमती आश्रमातून प्रयाण करण्यापूर्वी साबरमतीला परतणार नाही. साबरमतीचा निरोप घेऊन म. गांधी १२ मार्च १९३० रोजी दांडी यात्रेस निघाले. सविनय कायदेभंग आंदोलनातून संपूर्ण स्वराज्य प्राप्त झाले नाही. गांधीजींनी केलेली प्रतिज्ञा कायम ठेवायची होती. त्यानंतर विधायक व रचनात्मक कार्यासाठी वेळ मिळावा म्हणून गांधीजींनी काँग्रेसचा राजीनामा दिला. अशा परिस्थितीत जमनालाल बजाज यांनी गांधीजींना वर्धा येथे कायम वास्तव्य करण्यास विनंती केली. गांधीजींनी त्यांची विनंती मान्य करुन काँग्रेसच्या मुंबई अधिवेशनातून थेट वर्धेला आले (२९ ऑक्टोंबर १९३४) प्रथम ते कन्याश्रमात राहू लागले. नंतर मगनवाडी येथे राहीले. पण तेथे त्यांचे मन रमत नव्हते. कारण त्यांना रचनात्मक कार्य करण्यासाठी खेडेगावात राहायचे होते. तसा त्यांनी निर्धारच केला होता. दिनांक १७ एप्रिल १९३६ रोजी वर्ध्याच्या आग्नेय आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या सेगावला जाऊन गांधीजींनी तेथे स्थायिक होण्याचा मनोदय गावातील लोकांजवळ व्यक्त केला. सेगाव प्रामुख्याने हरिजन वस्तीचे गाव होते. ते जमनालालजीच्या मालगुजारीत होते. या गावात स्थायीक होण्याचा गांधीजींनी निर्धार पक्का केला. त्याप्रमाणे ३० एप्रिल १९३६ रोजी गांधीजी वर्धेवरुन सेगावला पायी चालत गेले. गावाचे नाव सार्थ करण्यासाठी गांधीजींनी त्या गावचे नाव ५ मार्च १९४० पासून 'सेवाग्राम' असे ठेवले. दुसरे कारण म्हणजे वऱ्हाडात शेगाव नावाचे दुसरेही गाव होते. त्यामुळे डाक सेवेमध्ये बरेचदा गोंधळ होत होता. त्याकारणाने सुद्धा 'सेवाग्राम' हे नाव

ठेवण्याचा निर्णय घेतला. यावरुन हे स्पष्ट होत की, जमनालालजीच्या प्रयत्नामुळेच महात्मा गांधीजी वर्धेला स्थायिक होऊ शकले. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीत वर्धा जिल्ह्याचे स्थान महत्वपूर्ण ठरण्यास जमनालाल बजाज यांची भूमिका निश्चितच महत्त्वाची राहीली. गांधीजींच्या वास्तव्यामुळे वर्धा जिल्ह्याचे नाव जगाच्या नकाशावर  झळकू लागले. अनेक थोर पुढारी वर्धा सेवाग्रामला येऊन गेले. चार्ली ॲंड्र्युज, जॉर्ज, स्लोकोम्ब क्रिप्स योजना आणारा सर स्टॅफर्ड क्रिप्स. इ. मोठ्या व्यक्ती सेवाग्रामला आल्यात.

- **जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचा सहभाग:**

स्त्रियांच्या उद्धाराच्या अनेक चळवळी झाल्या. परंतु महात्मा गांधींच्या काळात स्त्रियांनी प्रथमच प्रत्यक्षपणे सामाजिक व राजकीय आंदोलनात पुरुषांच्या बरोबरीने भाग घेतला. गांधीजींच्या काळात भारतीय स्त्रियांनी टाकलेले हे एक ऐतिहासिक पाऊल होते.

- **सत्याग्रह आश्रम :**

असहकार चळवळीत जिल्ह्यात सत्याग्रह आश्रमाची भूमिका महत्वाची राहीली. सत्याग्रह आश्रमाची विधीपूर्वक स्थापना जुलै १९२१ च्या गुढीपाडव्याला ग्रामोद्योग संघाच्या जागेवर झाली. राधाकृष्ण बजाज, गोपाळ वाळुंजकर, गोपाळ काळे, बाबाजी मोघे, घाणेकर, दीपकदत्त चौधरी इत्यादी कार्यकर्ते रचनात्मक कार्यात सहभागी झालेत. त्यांच्या बरोबरच जानकीदेवी बजाज, मालतीबाई थत्ते, शांताबाई काळे, गंगुताई वाळुंजकर, शरयुताई धोत्रे ह्या स्त्रिया रचनात्मक व विधायक कार्य करण्यास पुढे सरसावू लागल्या. जिल्ह्यातील जानकीदेवी बजाज आणि 'कस्तुरबा' ह्या स्त्रियांचे स्फुर्तीस्थान होत्या. त्यामुळे त्यांच्या परिवारात दाखल झालेल्या स्त्रिया त्यांच्या सारख्याच त्याग व सेवा समर्पित करण्यास कटिबद्ध  होत्या. त्यामुळे असहकार चळवळ, झेंडा सत्याग्रह सविनय कायदेभंग चळवळ, मिठाचा सत्याग्रह, विदेशी कापडावर बहिष्कार, दारु पिकेटिंगचे कार्य, वैयक्तिक सत्याग्रह, छोडो भारत आंदोलन यामध्ये जिल्ह्यातील स्त्रियांनी केलेली ही कामगिरी ऐतिहासिक ठरली आहे. त्यानी या चळवळीतून आपले कर्तृत्व व क्रियाशिलता सिध्द केली.

## प्रकरण चौथे

# महात्मा गांधीचे तत्वज्ञान आणि स्त्रिया

गांधीजींना स्त्री शक्तीची प्रथम जाणीव आफ्रिकेमध्ये झाली. आफ्रिकेतील सत्याग्रहाचे नेतृत्व करताना जेव्हा गांधीजींनी स्त्रियांना पाहिले तेव्हा त्यांना जाणवले की, पुस्तकी विद्येने नव्हे तर सहनशक्ती व विश्वास यातून निर्माण झालेले कणखर मन हे नेतृत्वासाठी आवश्यक आहे. (हरिजन, डिसेंबर ३१, १९३८) या सत्याग्रहामध्ये स्त्रियांचा सहभाग पाहून गांधीजी लिहितात, "Many of our movements stop halfway because of the condition of our women. much of our work does not yield appropriate result our lot is like that of penny-wise and pound foolish trader who does not employ enough capital in his business" गांधीजींच्या विचाराने प्रभावित झालेल्या अनेकांनी आपल्या स्त्रियांना काँग्रेसच्या चळवळीत भाग घ्यावयास उत्तेजन दिले. त्यामुळे त्या काळात महात्मा गांधींच्या विचाराने प्रभावित होऊन पदवीधर झालेल्या प्रेमाकंटक, कृष्णा घुमटकर यांच्या सारख्या काही मुलींनी अविवाहीत राहून स्वातंत्र्याच्या चळवळीत आमरण भाग घेण्याचा निश्चय केला. पुण्याच्या किर्लोस्कर थिएटरमधील गांधीजींच्या भाषणातील स्त्रियांना उद्देशून काढलेल्या उद्‌गाराने प्रभावित झालेल्या सत्यभामाबाई कुवळेकर या बालविधवेने अंगावरचे सर्व दागीने उतरवून स्वराज्याच्या चळवळीसाठी दिले. सुशिला पै याही बालविधवा होत्या. त्या दोघींनीही काँग्रेसच्या चळवळीला आमरण वाहून घेतले. मोठ्या संख्येनी गांधींच्या विचाराने स्त्रिया प्रभावित झाल्या होत्या. शांतता व सनदशीर मार्गाने लोकशक्ती जागृत करुन स्वातंत्र्य लढा लढण्याचे गांधीचे धोरण होते. स्वराज्य, असहकार, अहिंसात्मक प्रतिकार, सत्याग्रह, खादी यांचा प्रचार करण्यासाठी गांधींनी देशाचा दौरा केला आणि जहाल, मवाळ, समाज सुधारक या सर्वांना एकत्र आणले. स्त्री आणि पुरुष तत्वत: समान आहेत. स्त्री स्वत:चे व्यक्तिमत्व आहे. अहिंसात्मक संघर्ष करण्यास स्त्रीच अधिक लायक आहे. घराच्या चार भिंतीतून स्त्रिया बाहेर पडल्याशिवाय स्वातंत्र्य चळवळीला सामर्थ्य प्राप्त होणार नाही असे जाहीरपणे प्रतिपादन करुन त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य चळवळीत सामील होण्याचे आवाहन केले. शिक्षित होऊ लागलेल्या मध्यम वर्गीय स्त्रियांवर त्याचा मोठा

परिणाम झाला. परिणामस्वरुप स्त्रियांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत विविध आघाड्यावर मोठ्या प्रमाणात भागीदारी करण्यास सुरुवात केली.

## ▪ महात्मा गांधीच्या जीवनातील परिवर्तनाचे पर्व :

दक्षिण आफ्रिकेत गांधीजी वकिली करीत होते. एके दिवशी जॉन रस्किन यांचे Unto the Last हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले आणि त्यांच्या जीवनातील परिवर्तनाचे एक महान पर्व सुरु झाले. प्राचीन व अर्वाचीन काळातील काही ग्रंथ आणि भारतीय दर्शनिकांचा स्वामी विवेकानंदाचा राजयोग, भगवद्‌गीता, पंतजली योगसूत्रे इ. गांधीनी सखोल अभ्यास केला होता. सेवाभावी साधे जीवन जगण्याचा संकल्प त्यांनी केला. १९०४ मध्ये ' फिनिक्स' व १९१० मध्ये 'टॉलस्टॉय' आश्रम स्थापन करुन श्रमाधिष्ठित आश्रमीय जीवन जगण्यास त्यांनी सुरुवात केली. १९११ मध्ये त्यांनी वकिली बंद केली. अन्यायग्रस्त हिंदबांधवांची सेवा सुरु केली. वयाच्या सदतिसाव्या वर्षी (१९०६) गांधीनी ब्रह्मचर्य पालनाची प्रतिज्ञा केली. याच वेळेस गांधीना स्त्री शक्तीची जाणीव झाली.

भारतात आल्यावर कोचराब (अहमदाबादजवळ) येथे २५ मे १९१५ रोजी सत्याग्रहाश्रम स्थापन केला. १९१७ मध्ये हाच आश्रम त्यांनी साबरमतीला हलविला. 'विश्वहिताच्या अविरोधी अशी देशसेवा' या एका वाक्यात त्यांनी आश्रमस्थापनेचा उद्देश स्पष्ट केला.

## ▪ महात्मा गांधींचा स्त्रीविषयक दृष्टिकोण :

पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' एवढ्यापुरतेच मर्यादित केले. महात्मा गांधींना मात्र हे मान्य नव्हते ते म्हणत होते. "माझी आशा स्त्री जातीवर जास्त आहे. स्त्री शिवाय सत्य, अहिंसा सृष्टीत उतरणे अशक्य आहे." त्यांचा स्त्री जातीवर जास्त विश्वास होता त्यांच्या मते पुरुष स्त्रियांशी कधीच बरोबरी करु शकत नाही. कारण निस्वार्थ सेवा भावाचा गुण हा स्त्री वर्गात निसर्गत:च प्राप्त झालेला आहे. दु:ख पाहताच विरघळणारे करुणामय अंत:करण स्त्री जातीचे असते. स्त्री व पुरुष या दोघांमध्ये स्त्री जात अधिक थोर आहे. अशा शब्दात महात्मा गांधींनी स्त्रियांना मान सन्मान दिला. त्यामुळे स्वातंत्र्याची चळवळ ही पुरुषांपुरतीच मर्यादित न राहता स्त्रियांनाही सहभागी करुन घेणारी ही चळवळ महत्वपूर्ण ठरली. महात्मा गांधीनी स्त्री कशी श्रेष्ठ आहे ती कशी श्रेष्ठ आहे, ती कशी सबला आहे हे अनेक भाषणातून, पत्र लेखनातून

स्त्रियांशी केलेल्या संवादातून समाजाला पटवून दिले. त्यामुळे गांधींचा स्त्रीविषयक दृष्टिकोण स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी आजही महत्वाचा ठरणारा आहे. हे त्यांनी केलेली भाषणे संवाद आणि पत्र लेखन या ऐतिहासिक दस्तऐवजावरुन सिध्द होते. धर्मशास्त्रात स्त्रीला फार गौण लेखले पण स्त्रीचे हे गौणस्थान गांधीना मान्य नव्हते त्यांच्या मध्ये, "माझ्यात जे काही चांगले असेल ते सर्व माझ्या आईकडून मिळाले आहे. म्हणून मी स्त्रीकडे कधीही विषयवासनेच्या, तृप्तीचे साधन म्हणून पाहत आलो नाही. "महात्मा गांधींनी स्त्री-पुरुष समानता, स्त्री स्वातंत्र्य यावर विशेष भर दिला. त्यांच्या मते, स्त्री-पुरुष एकच आहे. दोघांच्या ठायी एकच आत्मा वास करतो. वास्तविक प्राचीन काळापासून पुरुषाने स्त्रीवर स्वामित्व गाजविले. त्यामुळेच खरे पाहता स्त्रियांमध्ये न्युनगंडाची भावना निर्माण झाली आणि पुरुषांपेक्षा स्त्री कनिष्ठ आहे ही पुरुष वर्गाची स्वार्थी शिकवण सहजतेने तिला खरी वाटू लागली. त्या कारणानेच तिची मानसिकता तशी घडली, की आपण पुरुषांपेक्षा कनिष्ठ आहे. म्हणून महात्मा गांधी म्हणतात, "स्त्री स्वातंत्र्याचा मार्ग केवळ त्यांना शिक्षण देणे हा नाही तर पुरुषवर्गाचा त्यांचेविषयी दृष्टिकोण बदलणे व तद्नुसार आचार पालटणे हा आहे. याचा अर्थ स्त्रीला कितीही स्वातंत्र्य दिले तरी सुध्दा पुरुषी दृष्टिकोन जर बदलला नाही तर अशा स्वातंत्र्याला काहीही अर्थ राहणार नाही, याची जाणीव गांधींना होती. स्त्री स्वातंत्र्याचा विचार करतांना महात्मा गांधीनी स्त्री शिक्षणाला फार प्राधान्य दिले. त्यांच्या मते "हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर मी जीवंत असले आणि माझा अधिकार चालू राहील, तर मी स्त्री शिक्षणावर अधिक भर देईल."[८] यावरुन हे लक्षात येते की, महात्मा गांधींना स्त्रियांविषयी फार तळमळ, कळकळ होती. स्त्रिया सक्षम झाल्या पाहिजे यासाठी त्यांच्यामध्ये असणाऱ्या सुप्त शक्तींना महात्मा गांधींनी पुरेपुर ओळखले होते. म्हणूनच ते पुढे म्हणतात, "आपल्या एवढ्या मोठ्या देशात अर्ध्यापेक्षा जास्त संख्या स्त्रियांची आहे. त्यांची जोवर पायमल्ली होत आहे. तोपर्यंत हा देश कधीही समृध्द होवू शकणार नाही. म्हणून ज्यांना या देशाच्या समृध्दीचा ध्यास लागला आहे. त्यांना मी हाका मारुन सांगतो की, आपल्या जीवनात प्रत्येक कार्यात व प्रत्येक प्रसंगी आपल्या बरोबर स्त्रियांना जितके ठेवता येईल, तितके ठेवा." यावरुन हे लक्षात येते की ज्या पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्री-पुरुष समानतेला मान्य केले नाही, त्या संस्कृतीला छेद देण्याचे कार्य मात्र महात्मा गांधींनी केले.

महात्मा गांधींचा स्त्री विषयक दृष्टिकोन हा केवळ शाब्दिक अथवा बौद्धिक चर्चेपुरता नव्हता. तर त्यांच्या लिखानाचा, भाषणाचा उद्देश नेहमीच 'कृती' हाच राहिला आहे. स्त्रियांनी अबला म्हणजेच (object) राहू नये तर सबला (कर्ता) बनावे अशी त्यांची भूमिका आहे. गांधी म्हणतात स्वत:च्या पतीलाही योग्य कारणासाठी नकार देण्याचे धैर्य दाखवा. शक्ती, सामर्थ्य, ताकद, बल हे शब्द जेव्हा गांधी वापरतात तेव्हा शारीरिक शक्ती किंवा आक्रमकता त्यांना अभिप्रेत नाही. तर प्रेम, त्याग, सेवा करण्याची मानसिक, शारीरिक शक्ती भोगलालसा व वासना नियंत्रित करण्याची मानसिक शक्ती व अनिष्ठांचा विरोध करण्याची प्रतिकार शक्ती या माणसाच्या शक्ती आहेत. असे गांधींना वाटते. याच्या आधारे जगातील कोणत्याही अत्याचारी, दुष्ट अवस्थेविरुद्ध व सत्तेविरुद्ध लढण्याचे सामर्थ्य मनुष्याला मिळते आणि या सर्व शक्ती स्त्रीकडे पुरुषांपेक्षा निसर्गत:च अधिक आहेत वास्तविक घराबाहेरच्या क्षेत्रात नेतृत्व देणे, प्रतिष्ठेचे व बरोबरीचे स्थान देणे हे तोपर्यंत पुरुषी संस्कृतीला मान्य नव्हते. पण महात्मा गांधींच्या स्त्री विषयक दृष्टिकोनाचा परिणाम स्त्रियांचा भारतीय राजकारणातील सहभाग एक क्रांतीकारक बदल होता. नैतिकतेच्या बाबतीत पुरुषांपेक्षा स्त्री श्रेष्ठच ठरते अशी गांधीची धारणा आहे. स्त्रीला त्यांनी दुर्बल कधीच मानले नाही. स्वत:च्या मानसिक व आत्मिक सामर्थ्याची जाणीव स्त्रीने करुन घेतली पाहीजे या मताचे गांधी होते. गांधींचा हा स्त्री विषयक दृष्टीकोन आजही महत्वपूर्ण ठरणारा आहे. त्याला मात्र गरज आहे ती कृतीची.

अशाप्रकारे युगायुगाच्या गुलामगिरीतून स्त्रीला सोडवून तिला समाजात हक्काचे स्थान मिळवून देण्याचे श्रेय गांधीनाच द्यावे लागेल. त्यांनी स्वयंपाक घराच्या कोंडवाड्यातून स्त्रीला बाहेर काढले. तिला स्वाभिमानाची शिकवण दिली व तिला शूर आणि निर्भय बनविले. ज्या स्वराज्यात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान नाही ते स्वराज्यच नव्हे, असे गांधीचे मत होते. त्यामुळे गांधींचा स्त्री विषयक दृष्टिकोन केवळ ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचा आहे. असे म्हणता येणार नाही, तर वर्तमान व भविष्यातही स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

- **म. गांधी आणि स्त्री प्रतिमा :**

म. गांधींच्या विचारसरणीत भारतीय स्त्रीला स्वत:ची नवी प्रतिमा प्राप्त झाली. त्यामुळे स्त्री-पुरुष समानतेचे महत्वही कळले. गांधींनी स्त्री मुक्ती हा शब्द आजच्या संदर्भात जरी वापरला

नसला, तरी स्त्री-मुक्तीचेच कार्य होते असे म्हणावयास हरकत नाही. गांधींनी बालविवाह, विधवांचे दमन, जरठ कुमारी विवाह, हुंडा व पडदा पद्धतीला विरोध केला. हरिजनांच्या प्रश्नांनी त्यांनी स्त्रियांना अगदी तर्कशुद्धतेने जोडले. हरिजन व भंगी हे जर घाण काम करणारे लोक आहेत म्हणून अस्पृश्य तर आई मुलांसाठी हेच काम करते ना? ती अस्पृश्य असते का ? आई जे काम आपल्या मुलांसाठी करते ते काम हरिजन समाजाकरीता करतात, ते समाजाची आई प्रमाणे सेवा करतात ना? मग ते अस्पृश्य कसे अशा स्वरुपाच्या संदेशातून गांधींनी स्त्रियांना असे सूचित केले की, "जातीयवादातून पुरुषांची मुक्तता करणे, हे स्त्रियांनाच शक्य आहे. "पुरुषांनी हरिजनांना घरात घेतले पाहिजे व माणूस म्हणून वागवले पाहिजे. हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत आम्ही घरात स्वयंपाक करणार नाही. कारण हेच काम आम्हीही मुलांसाठी करतो" परिणामी नगरच्या जानकीबाई आपटे, मालवणच्या मदालसा भांडारकर यांनी हरिजन मुलींना घरात ठेवून घेतले आणि समाजाला धडा घालून दिला.

स्त्रियांसोबत संवाद साधतांना अनेकदा गांधीजी त्यांच्या समोर परंपरागत आदर्श नव्या स्वरुपात मांडत असत, ते म्हणत, "सीता, द्रौपदी, मीराबाई यांची थोरवी प्रत्येक भारतीय स्त्री-पुरुषांच्या मनात खोलवर रुजलेली आहे. त्यात नवीन असे काहीही नाही. सीता दुबळी नव्हती. अतिशय कठीण व गंभीर परिस्थितीत तिने नैतिक धैर्य दाखवले होते. मीराबाई ही असामान्य धैर्यवती होती. तिने जो विचारपूर्वक मार्ग निवडला, त्या मार्गावरुन सामाजिक, कौटुंबिक विरोधात न जुमानता ती चालत राहीली म्हणून त्या आजही आदर्श आहेत. स्त्रीला दुबळी मानणे हा पुरुषांनी स्त्रियांवर केलेला अन्याय आहे, असे ते मानत शक्तीचा अर्थ जर नैतिक शक्ती हा असेल तर स्त्रिया या पुरुषांपेक्षा कितीतरी पटीने सशक्त आहेत. स्त्रियांची सहनशक्ती, स्वार्थत्याग, अतुलनीय धैर्य या गोष्टी त्यांच्या सशक्ततेची उदाहरणे आहेत. स्त्रीशिवाय पुरुष अपूर्ण आहे." असे गांधींचे स्पष्ट मत होते. स्त्रीला गुलामाचा दर्जा हा शेकडो वर्षे चालत आलेल्या अनिष्ट प्रथेतून दिला गेला. सर्व कायदे पुरुषांनीच केले आणि ते स्वत:च्या फायद्यासाठीच केले, ही परिस्थिती सुधारण्याचा स्त्रियांसमोर असलेला एकमेव मार्ग म्हणजे त्यांची आग्रही इच्छाशक्ती आपल्याला नेमके काय हवे ते ठरवून ते प्राप्त करुन घेण्याबाबत त्या सजग व समर्थपणे उभ्या

राहिल्या पाहिजेत, असे ते म्हणत स्त्रियांनी बेजबाबदार व सुखलोलूप बनू नये. असे त्यांचे स्पष्ट मत होते.

महात्मा गांधींच्या विचारानेच प्रभावित होऊन भारतीय स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीच्या प्रारंभापासून ते शेवटपर्यंत प्रत्येक टप्प्यात, प्रत्येक लढ्यात विविध कष्टकरी वर्गाच्या हितरक्षणासाठी चाललेल्या संघर्षात व सर्वसमावेशक स्वातंत्र्य चळवळीत स्वत:वरील सरंजामी बंधने झुगारुन, सरंजामी विचारांची जळमटे बाजूला सारुन निस्वार्थपणे स्वत:ला झोकून दिलेले दिसून येते. स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांच्या या उज्वल कामगिरीची दखल घेऊनच संविधानकारकांना भारतीय संविधानात स्त्रियांना सर्वच बाबतीत पुरुषांबरोबर समानदर्जा द्यावा लागला आहे. २१ व्या शतकात स्वतंत्र लोकशाही भारतात स्त्रियांच्या कर्तृत्वाला व चळवळीला जी दिशा प्राप्त झाली त्यात महात्मा गांधींचे योगदान अविस्मरणीय स्वरुपाचे आहे.

## प्रकरण पाचवे

# असहकार व सविनय कायदेभंग चळवळीत महिलांचा सहभाग

- **वर्धा जिल्ह्यातील असहकार चळवळ :**

नागपूर अधिवेशनानंतर जमनालाल बजाज यांनी १९१८ ला ब्रिटिश सरकारकडून प्राप्त झालेली ऑनररी मॅजिस्ट्रेट व १९१७ ला प्राप्त झालेली रायबहादुरी ही पदवी ९ एप्रिल १९२१ रोजी सरकारला परत केली. आर्वीचे सेठ गोपालदास राठी यांनी ऑनररी मॅजिस्ट्रेट व बाबासाहेब देशमुख व रावसाहेब मोहिनी यांनी सरकारी नोकरीचा त्याग करुन असहकार चळवळीत भाग घेतला. गांधीजींच्या आव्हानानुसार निळकंठराव देशमुखांनी प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीतील आपली उमेदवारी मागे घेतली. श्रीकृष्णदास जाजू, परशुराम थत्ते, श्री. अगस्ती, श्री. नागले, श्री. शिंगरु यांनी आपल्या वकिलीचा त्याग केला. जिल्ह्यात अहसकार चळवळीचे वारे वाहायला लागले. महिलांमध्ये जानकीदेवी बजाज यांनी असहकार व स्वदेशीवर भाषण देण्याची मोहीम सुरु केली. वर्धा, देवळी, पुलगांव, हिंगणघाट या ठिकाणी जाऊन भाषणे देऊ लागल्या. त्याच्या भाषणाला स्त्रियांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात मिळत होता. अनेक ठिकाणी त्यांच्या भाषणाचा स्त्रियांवर इतका प्रभाव पडला की, सभेच्या जागीच काही स्त्रियांनी आपल्या विदेशी बांगड्या फोडल्या. जिल्ह्यात आणि वर्धा तालुक्यात अशा प्रकारच्या प्रचार सभेमुळे स्त्रियांमध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण होऊ लागली. महाराष्ट्रातील स्त्रियांनी प्रथम भाग घेतला. तो मुळशी सत्याग्रहात डॉ. इंदुमती नाईक या त्यामध्ये प्रमुख होत्या. मावळ तालुक्यातील घारे शास्त्री व परचुरे शास्त्री या दोघांच्या पत्नी या सत्याग्रहात सामील झाल्या पाच तालुक्यातील शेतकऱ्यांच्या स्त्रियासुद्धा या सत्याग्रहात सहभागी झाल्या. त्यांचे पडसाद विदर्भातही उमटले. विदर्भातून पुरुषच नव्हे तर स्त्रियाही स्वयंसेविका म्हणून मूळशी सत्याग्रहात सहभागी होण्यांस गेल्या, त्यामध्ये वर्धेच्या सत्यभामाबाई होत्या. त्यामुळे हळूहळू का होईना महात्मा गांधीच्या प्रेरणेनी स्त्रियांचा सहभाग वाढण्यांस सुरुवात झाली.

- **सत्याग्रह आश्रमाचे कार्य :**

सत्याग्रह आश्रमाच्या विद्यमाने १९२४ पासून सत्याग्रहा व्यतिरिक्त अस्पृश्यता-निवारण, ग्रामसफाई, अंधश्रद्धा निर्मुलन, वस्त्रविद्या प्रयोग, कृषिविद्या प्रयोग, गोसेवा, आहार प्रयोग,

प्रार्थना व स्वाध्याय, हे रचनात्मक कार्य अविरतपणे चालू करण्यात आले. गावोगावी आश्रमवासी जाऊन अस्पृश्यांना आत्मबलाची शिकवण देत. ग्रामसफाईचे महत्त्व पटवून दिले जात होते. चरखा, विणकाम, टकळी आणि संबंधित साहित्य व कृतीचे शिक्षण देऊन सूतकताई व विणाईच्या उपकरणामध्ये सुधारण करण्यासाठी प्रयोग करण्यात येत. बाळकोबा भावे, विनोबाजी, वाळुंजकर हे तर गोसेवा व आहारासारख्या सकृतदर्शनी क्षुल्लक वाटणाऱ्या बाबीवरही लक्ष ठेवीत. या सर्व रचनात्मक व विधायक कार्यात महिलांना सुद्धा सहभागी करुन घेतल्या जात होते. विशेषत: या रचनात्मक व विधायक कार्यक्रमात स्त्रियांना आवड असल्यामुळे त्यामधुन सामाजिक जाणीव विकसीत होण्यास मदत झाली.

- **दारु पिकेटिंग व विदेशी मालावर बहिष्कार :**

असहकार चळवळींचा एक भाग म्हणून दारुच्या दुकानासमोर निरोधने करणे विदेशी मालावर बहिष्कार टाकण्यासाठी जनतेमध्ये जागृती करण्यात येऊ लागली. १९२१ मध्ये महात्मा गांधींना दारुचे गुत्ते घेऊ नका असा संदेश भारत वासियांना दिला. वर्धा येथे मद्यपानाविरुद्ध चळवळ स्वयंस्फुर्तीने चालू होती. दारु पिकेटिंगच्या कार्यक्रमामुळे लिलाव घेणारे समोर येत नव्हते. वर्धा रेल्वे स्टेशनवरुन दारुचे पिंप आणण्यासाठी किंवा पोहचवण्यासाठी हमाल व टांगेवाले मिळत नव्हते.

फेब्रुवारी १९२१ मध्ये महात्मा गांधीनी परदेशी कापडावर कडकडीत बहिष्कार घालणे सुलभ व्हावे म्हणून सूत काढण्याची कला शिकण्याचा जनतेला आग्रह केला. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. याचा प्रचार करण्यासाठी जानकीदेवी बजाज व त्यांच्या सहकारी महिला जिल्ह्यातील गावा-गावात जाऊन जोरदार प्रचार सभा घेतल्या. देवळी येथे जानकीदेवी बजाज यांनी असहकार व स्वदेशीवर जे भाषण दिले त्या भाषणाला अनेक स्त्रिया उपस्थित होत्या. दि. ५ एप्रिल रोजी सत्यदेव पंजाबी व सत्यभामाबाई यांनी पुलगावला असहकारावर भाषणे दिली. त्यांच्या भाषणांना स्त्रियांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात मिळत होता. या असहकार चळवळीत जिल्ह्यात जानकीदेवी बजाज आघाडीवर होत्या. त्यामुळे त्या जिल्ह्यातील स्त्रियांच्या प्रेरणास्त्रोत बनल्या त्यानंतर स्त्रियांचा असहकार चळवळीत सहभाग वाढू लागला.

## ■ सविनय कायदेभंग चळवळीची पार्श्वभूमी :

मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली २९ डिसेंबर १९२८ रोजी कलकत्ता येथे कॉंग्रेसचे त्रेचाळीसावे अधिवेशन भरले त्यात एका वर्षाच्या मुदतीत म्हणजे ३१ डिसेंबर १९२९ पर्यंत वसाहतीचे स्वराज्य सरकारने दिले नाही, तर अहिंसक, असहकारी सविनय कायदेभंगाचा कार्यक्रम हाती घेऊन कायदेभंगाची चळवळ चालू करावी असा ठराव पास झालेला होता. ३१ डिसेंबर १९२९ रोजी कॉंग्रेसच्या लाहोर येथील अधिवेशनात,वसाहतीचे स्वराज्य सरकारने न दिल्यामुळे जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली "पूर्ण स्वातंत्र्याकरता लढा देण्याची प्रतिज्ञा करण्यात आली. प्रतिज्ञा पत्राचे वाचन करण्याचे आव्हान करुन २६ जानेवारी हा स्वांतत्र्य दिन म्हणून मानला जावा असा ठराव घेण्यात आला. या अधिवेशनात कॉंग्रेसचे कोषाध्यक्ष म्हणून वर्ध्याचे जमनालाल बजाज यांची निवड झाली. सविनय कायदेभंगाच्या कार्यक्रमाची आखणी करण्याचे कार्य कॉंग्रेस वर्कींग कमिटीवर म्हणजेच महात्मा गांधीवर सोपविण्यात आले. महात्मा गांधीनी सामोपचाराच्या हेतूने अकरा मागण्याचे पत्र व्हाईसरॉय यांना पाठविले. सरकारने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे १४ आणि १५ फेब्रुवारी १९३० रोजी कॉंग्रेस कार्यकारणीची सभा साबरमती येथे झाली. त्यात कायदेभंगाची चळवळ सुरु करण्याचा निर्णय घेऊन लढयाचे नेतृत्त्व महात्मा गांधीकडे सोपविले. महात्मा गांधीनी २ मार्च १९३० ला व्हाईसरॉयल पत्र लिहून १० मार्च पासून मिठाचा कायदा मोडणार असल्याचे त्यांनी कळविले. कायदेभंगाचा श्रीगणेशा करण्यासाठी महात्मा गांधींनी १२ मार्च १९३० रोजी साबरमती आश्रमातून दांडीकडे प्रयाण केले. दांडीच्या समुद्रकिनाऱ्यावरील ६ एप्रील रोजी मीठ उचलून महात्मा गांधीनी सरकारी कायद्याचा भंग केला. ६ एप्रील पासून देशात राष्ट्रीय सप्ताह सुरु झाला आणि कायदेभंगाच्या चळवळीला सुरुवात झाली.

## ■ स्त्रियांना आवाहन :

महात्मा गांधीनी कायदेभंगाच्या चळवळीत स्त्रियांना सहभागी होण्याचे आवाहन केले. ३० एप्रील १९३० च्या यंग इंडिया मध्ये स्त्रियांना उद्देशून आवाहन केले की, त्यांनी कायदेभंगाच्या चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा. प्रत्येक खेड्याने बेकायदेशीर मीठ आणने, किंवा बनविणे, स्त्रियांनी दारुच्या दुकानासमोर निरोधने करावीत, परदेशी कापडाची होळी करावी, सरकारी

शाळा, सरकारी नोकरीचा त्याग करावा. गांधीजींच्या या आव्हानावरुन स्त्रियांनी कायदेभंगाच्या चळवळीत मोठ्या संख्येनी भाग घेतला. वर्धा जिल्ह्यात तर असहकार चळवळीने व झेंडा सत्याग्रहाने आधीच स्त्रियांमध्ये जागृतीचे वातावरण निर्माण झाले होते. या चळवळीचे विशेष म्हणजे यामध्ये उच्च, मध्यम व कनिष्ठ वर्गातील स्त्रियांनीही भाग घेतला. त्यामुळे स्वातंत्र्याची चळवळ उच्च वर्गीय पुरतीच मर्यादीत होती असे म्हणने संयुक्तीक वाटत नाही.

- **मिठाचा सत्याग्रह :**

महात्मा गांधीनी विलेपार्ले मुंबई येथे मीठाच्या कायदेभंगासाठी वर्ध्याचे जमनालाल बजाज यांची काँग्रेसची सर्वाधिकारी म्हणून नियुक्ती केली. ह्या छावणीत पुरुष सत्याग्रहीपेक्षा महिला सत्याग्रहींची संख्या अधिक होती. पुरुष १४४ तर महिला १६४ होत्या. समुद्रातून पाणी आणून मीठ बनविण्याचा प्रयत्न करीत असतांना सरकारने जमनालाल बजाज यांना अटक केली. त्यांच्या अटकेनंतर २० एप्रील रोजी काँग्रेसच्या सर्वाधिकारी कमलादेवी सोनावाला नंतर जानकीदेवी बजाज ह्या सर्वाधिकारी बनल्या, त्यांनी स्त्रियांना या चळवळीत सहभागी होण्यास प्रेरित केले. विलेपार्ले छावणी जप्त झाल्यावर जानकीदेवी मुंबईहून वर्धेला आल्या, वर्धेला आल्यानंतर गंगुबाई भुसारी आणि शांताबाई काळे बरोबर जिल्ह्यात प्रचार दौरे सुरु केले. जानकीदेवी बजाज यांनी विरुळच्या निळकंठराव देशमुखांकडून दहीहांड्याच्या मिठाचा पुडा रु. १०० ला विकत घेतला. नागपूरहून अनुसयाबाई काळे वर्धा प्रचारासाठी आल्या. त्यांनी दि. २२/०७/१९३० ला वर्धेला सभा घेऊन जंगल सत्याग्रहाकरीता लोकांना आवाहन केले. जानकीदेवी बजाज यांचे प्रचार कार्य जोरात सुरु होते. त्यांनी वर्धा जिल्ह्यात १९३० मध्ये ऑक्टोंबरच्या एका आठवड्यात १८ प्रचारसभा घेतल्या. विनोबा भावे यांनी गैरकायदा मीठाचा ७० पुड्या विकल्या. १९ एप्रील रोजी नेहरुच्या अभिनंदनाप्रित्यर्थ भरलेल्या जाहीर सभेत एकूण १४४ रुपयाचे बेकायदा मीठ विकण्यात आले. वर्धा जिल्ह्यातील सर्व तालुक्यात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी सुद्धा मीठाच्या सत्याग्रहाबाबत कायदेभंग करुन आपली कर्तृत्वक्षमता सिद्ध केली.

- **विदेशी कापडाचा बहिष्कार :**

स्त्रियांनी विदेशी कापडाच्या बहिष्कारामध्ये जास्तीत जास्त संख्येनी भाग घ्यावा असे आवाहन महात्मा गांधींनी केले. त्यांच्या या अहवालात जिल्ह्यातील स्त्रियांनी प्रचंड प्रतिसाद दिला. ६ जानेवारी १९३२ ला एक सभा घेण्यात आली. ह्या सभेमध्ये विमलबाई भावे व जानकीदेवी बजाज प्रमुख वक्त्या होत्या. त्यांनी विदेशीर वस्तुवर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली. या सभेला स्त्रियांची उपस्थिती जास्त होती. जानकीदेवी बजाज यांनी देवळी या ठिकाणी सभा घेतली. त्या सभेला स्त्रिया मोठ्या संख्येनी उपस्थित होत्या. त्या ठिकाणी विदेशी कापडाची होळी करण्यात आली. जानकीदेवी बजाज यांनी पुलगावला सत्याग्रहीकरीता छावणी उघडली. तेथे त्यांनी भाषणे दिली. त्या प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या स्त्रियांचे नेतृत्व करीत होत्या. स्त्रियांनी विदेशी कापडाच्या विक्रेत्याकडून विदेशी कापड विकणार नाही असे लिहून घेतले. वर्धा येथे ता. १०.०७.१९३० रोजी महादेव मंदीरात वाढोण्याच्या सौ. काशीबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. त्यात चंदाबाई पाठक, शांताबाई देशपांडे, सुशीलाबाई वैद्य, वेणूबाई शिंगरे, नानीबाई देशपांडे यांची भाषणे झालीत. सभेत स्वदेशी वस्तुंचा वापर करावा असे मत मांडल्यानंतर सर्व स्त्रियांनी विदेशी मालावर बहिष्कार टाकला. सोनेगाव आबाजी ता. वर्धा येथे सुतकताईचे कार्य सुरु झाले होते. येथील सत्याग्रहींनी प्राथमिक शाळेवर राष्ट्रीय झेंडा उभारला. सर्वांनी प्रभातफेरी काढून सभेत विदेशी कापडाच्या टोप्या जाळण्यात आल्या. वर्धा शहरात सत्याग्रह आश्रमाचे स्वयंसेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी या सर्वांनी शहरात फिरुन विदेशी कपडे गोळा करुन सायंकाळी गांधी चौकात श्री. केशवप्रसाद तिवारी यांच्या हस्ते होळी करण्यात आली. एकंदरीत विदेशी कापड बहिष्कार आंदोलनात स्त्रिया मोठ्या प्रमाणात आघाडीवर होत्या. त्यांनी या आंदोलनात आपली कर्तृत्वक्षमता सिध्द करुन दाखविली.

जानकीदेवी बजाज यांनी तर या आंदोलनाच्या प्रचार कार्यात फार मोलाची कामगिरी बजावली. वर्धेला ज्या सभा आयोजित करण्यात आल्या त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे होते.

| वक्त्याचे नांव | वक्त्याचे ठीकाण | दिनांक | स्थळ |
|---|---|---|---|
| जानकीदेवी बजाज | वर्धा | १४.०१.१९३२ | वर्धा |
| बहिणाबाई विदूर | वर्धा | १७.०११९६२ | वर्धा |

| | | | |
|---|---|---|---|
| चंद्राबाई | वर्धा | १७.०१.१९३२ | वर्धा |
| गंगुबाई गुरव | वर्धा | १७.०१.१९३२ | वर्धा |
| जानकीदेवी बजाज | वर्धा | १७.०१.१९३२ | वर्धा |
| जानकीदेवी बजाज | वर्धा | १७.०१.१९३२ | वर्धा |
| चंद्राबाई | वर्धा | १७.०१.१९३२ | वर्धा |
| जानकीदेवी बजाज | वर्धा | १८.०१.१९३२ | वर्धा |
| चंद्राबाई | वर्धा | १९.०१.१९३२ | वर्धा |
| दुर्गाताई जोशी | अकोला | ३१.०१.१९३२ | वर्धा |

अन्य प्रचार सभा वर्धा शहर आणि वर्धा जिल्ह्यातघेण्यात आल्या. देवळी येथे दि. ०४/०२/१९३२ रोजी जी सभा घेण्यात आली होती त्या सभेला ३०४० पुरुष व ४००० महिला उपस्थित होत्या. जानकीदेवी बजाज वक्त्या होत्या.

- **दारु पिकेटिंगचे कार्य :**

महात्मा गांधींनी कायदे भंगाच्या चळवळीत दारु पिकेटिंग करावे असे आवाहन केले. त्यानुसार जिल्ह्यात दारुवर बहिष्कार आणि पिकेटिंगला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. यामध्ये सुद्धा स्त्रिया मोठ्या संख्येनी आघाडीवर होत्या. वर्धेला १०.०२.१९३२ ला हरताळ पाळण्यात आला. दारुच्या दुकानावनर मिरवणूक नेण्यात आली. अनेकांची स्फुर्तीदायक भाषणे झाली. ता. २९ जुलै १९३० रोजी पळसगांव, (ता. वर्धा) येथील ताडीच्या दुकानावर सत्याग्रही स्वयंसेवकांनी जोमाने चळवळ सुरु केली. नागझरी येथे दारु पिकेटिंगचे कार्य करण्याससाठी नऊ स्वयंसेवकांची निवड केली. या कार्यात नागझरी सारख्या छोट्याशा गावातील अनेक स्त्रिया या चळवळीत सहभागी झाल्या. सत्याग्रह आश्रमचे श्री. वाळूंजकर यांनी खेड्यात फिरुन ठेकेदारांना ठेके न घेण्याविषयी आणि ताडीची झाडे न घेण्याविषयी सह्या घेतल्या. हिंगणघाट, पवनार, सेलू, येळाकेळी, येथील स्वयंसेवकांनी या चळवळीत भाग घेतला. ता. २७ रोजी अबकारी लिलावाचा दिवस उजाडला. स्त्री-पुरुष स्वयंसेवकांनी वाळुंजकरांच्या नेतृत्वात फार मोठे पिकेटिंगचे कार्य केले. त्यात गुलामबाई भूसारी, लक्ष्मीबाई धानुक, केशरबाई पोतदार, गंगाताई वाळूंजकर, चंद्राबाई भूसारी या महिलांनी भाग घेतला. या लिलावात सरकारला शेकडा ४० तोटा झाला. जिल्ह्यातील अनेक स्त्रिया दारु पिकेटिंगच्या कार्यात अत्यंत तळमळीने कार्य करीत होत्या.

# प्रकरण सहावे

# वैयक्तिक सत्याग्रह व भारत छोडो आंदोलनातील महिलांचा सहभाग

## ▪ वैयक्तिक सत्याग्रह (१९४०- १९४१)

जर्मनी व भारत यांच्यात कोणत्याही प्रकारचे वैर नसताना ग्रेटब्रिटनने आपल्या वर्चस्वाखालील वसाहत म्हणून भारताला दुसऱ्या महायुद्धात सहभागी करुन घेतले. केंद्रिय कायदेमंडळाचे किंवा भारतीय नेत्याचे मत विचारात घेण्याचा शिष्टाचार पाळण्याची गरज ब्रिटीश सरकारला जाणवली नाही. काँग्रेसच्या अनुमतीशिवाय भारताला महायुद्धात ओढले. व्हाईसरॉयने घेतलेला हा एकतर्फी निर्णय सर्वत्र निषेध व असंतोषाचा नियम बनला. ता. १५ सप्टेंबर १९४० रोजी मुंबई येथील काँग्रेसच्या सभेत म. गांधीनी काँग्रेसचे नेतृत्त्व स्वीकारावे असा ठराव पास झाला. त्यामुळे म. गांधीनी सरकारी धोरणाचा नैतिक निषेध म्हणून वैयक्तिक सत्याग्रहाचा लढा सुरु करण्याचा निर्णय घेतला.

## ▪ महात्मा गांधींची योजना :

सेवाग्राम येथून वैयक्तिक सत्याग्रहाची योजना महात्मा गांधीनी जाहीर केली. सविनय कायदेभंगाच्या प्रत्यक्ष कृतीची सुरुवात श्री. विनोबा भावे (वर्धा सत्याग्रह आश्रम ) करतील. तो त्यांच्याच पुरता मर्यादीत राहील.

## ▪ वैयक्तिक सत्याग्रह चळवळीचे स्वरुप :

युद्धविरोधी प्रचार आणि प्रस्तुत युद्धात भाग न घेण्यासंबंधी प्रचार करण्याचा हक्क असे चळवळीचे मर्यादीत स्वरुप आहे असे महात्मा गांधींनी जाहीर केले. अहिंसावादी काँग्रेसला इंग्लडचे अनिष्ठ चिंतणे शक्य नाही. अत्याचारानेच स्वातंत्र्य मिळविण्याचा काँग्रेसचा निर्धार असल्यामुळे काँग्रेस इंग्लडला मदतही करु शकत नाही. लोकांना एवढेच सांगावयाचे आहे की अनत्याचारी साधनांनी जर त्यांना स्वराज्य मिळवायचे असेल तर सरकारशी लष्करी सहकार्य करु नये. सहकार्याच्या विरुद्ध प्रचार करण्यासाठी निवडलेले लोक आपल्या हक्कासाठी सरकार हस्तक्षेप करीत नाही तोपर्यंत सत्याग्रह चालू ठेवतील.

- **प्रथम सत्याग्रही विनोबाजी :**

१६ ऑक्टोंबर १९४० रोजी महात्मा गांधीनी सेवाग्राम येथून प्रकाशित केलेल्या पत्रकात प्रथम वैयक्तिक सत्याग्रही म्हणून विनोबा भावे यांची निवड केली. म. गांधीच्या दृष्टीकोनातून ते प्रिय, आदरणीय, आदर्श सत्याग्रही होते. गांधीजी म्हणतात, 'माझ्यानंतर अहिंसेचे सर्वोत्तम प्रतिपादक आणि मूर्तिमान अहिंसक संस्कृत विद्धान पंडित विनोबाजी आहे''

- **वैयक्तिक सत्याग्रहाला प्रारंभ :**

विनोबा भावे यांनी महात्मा गांधीचा सेवाग्राम येथे आशीर्वाद घेऊन गांधीजीच्या सुत्रसंचालनानुसार १७ ऑक्टोंबर १९४० रोजी गुरुवार सकाळी ८ वाजता वर्ध्यापासून सहामैल अंतरावरील पवनारला पहिले 'युद्ध विरोधी ' भाषण करुन वैयक्तिक सत्याग्रहाचा शुभारंभ केला. पवनार येथे पाऊस पडत असतानाही सभेसाठी तिनशेच्या वर लोकसमुदाय मोठ्या उत्सुकतेने हजर होता. वर्धा येथून महादेव देसाई, जमनालाल बजाज, महिलाश्रमातील पन्नास विद्यार्थीनी आणि कॉंग्रेसचे पुढारी आले होते. आश्रमातील विद्यार्थिनींनी खादीचे हार अर्पण करुन सभास्थानी विनोबाजींचे स्वागत केले. वैयक्तिक सत्याग्रहात महिलाश्रमातील विद्यार्थिनींचा सहभाग भाषणाला उपस्थित राहाण्यापूरताच मर्यादीत नव्हता तर त्यामधून राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करण्याचा उद्देश होता. एवढेच नव्हे तर त्याग व मनाची शक्ती हे जीवनाचे सर्वस्व आहे हे स्त्रियांच्या मनावर बिंबवले जात होते. स्त्रीदेशसेविकांचे कस्तुरबा हे एक स्फूर्तिस्थान होते.

- **दुसरे सत्याग्रही जवाहरलाल नेहरु :**

म. गांधीनी दुसरे सत्याग्रही म्हणून जवाहरलाल नेहरु यांची निवड केली. गांधीजीच्या आदेशानुसार जवाहरलाल नेहरु यांनी वैयक्तिक सत्याग्रहासाठी ६ नोव्हेंबर १९४० हा दिवस निश्चित करुन महात्मा गांधींचा आशीर्वाद घेण्यासाठी ते वर्धा, सेवाग्राम येथे आले. गांधीजींचे मार्गदर्शन व आशीर्वाद घेऊन अलाहाबाद येथे परत जाताना ता. ३१ ऑक्टोंबर १९४० या दिवशी त्यांना चौकी (छीडकी) रेल्वे स्टेशनवर रात्री आठ वाजता पोलीसांनी अटक केली. या खटल्यात त्यांना चार महिण्याची शिक्षा दिली. त्यानंतर सेवाग्राम आश्रमातील ब्रम्हदत्त या नवयुवकाला सत्याग्रह करण्याची अनुमती देण्यात आली. ब्रम्हदत्त याने सरकारला सूचित करुन सत्याग्रहाला आरंभ केला. त्यालाही अटक झाली.

## ▪ नागझरी येथील सत्याग्रह :

१८ जानेवारी १९४१ रोजी नागझरी येथे विनोबाजींचा सत्याग्रह कार्यक्रम रात्री ९ वाजता आटोपला. या कार्यक्रमासाठी वर्ध्यातून वल्लभभाई, भाऊ पानसे, पंढरीनाथ गोखले, रामेश्वरजी, सीताराम, शिवाजी भावे सोबतच देवळीचे लोक होते. खंडेराव जाधवाच्या प्रयत्नाने नागझरी येथे कायदेभंग आंदोलनात जोम आलेला होता. अशा गावात विनोबाजीच्या कार्यक्रमाला भरपूर स्त्री व पुरुषांनी भाग घेतला. यावेळेसही विनोबाजींना अटक झाली. यामध्ये सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा दिली. ही शिक्षा भोगून ते १३ जुलै १९४१ ला मुक्त झाले. लगेच दुसऱ्या दिवशी ता. १४ जुलै रोजी नालवाडी येथे युद्धविरोधी भाषण दिले म्हणून तिसऱ्यांदा अटक झाली. १६ जुलै रोजी पुन्हा श्री कुंटे यांनी एक वर्षाची त्यांना शिक्षा दिली.

## ▪ श्रीमती शरयुताई धोत्रे आणि दमयंतीताई धर्माधिकारी यांचा सत्याग्रह :

वैयक्तिक सत्याग्रहात स्त्रियांनी सुद्धा सहभागी झाले पाहिजे. अशी गांधीजींची इच्छा होती. त्यानुसार गांधजींनी वर्धा येथील बजाजवाडीतील शरयुताई धोत्रे व दमयंतीबाई धर्माधिकारी यांची पहिल्या महिला सत्याग्रही म्हणून निवड केली. महिला वैयक्तिक सत्याग्रहींनी फक्त तीन दिवस घरी राहवयाचे त्यापेक्षा अधिक नाही असे सांगण्यात आले. त्या प्रत्येक घरात चुलीपर्यंत जाऊन पोहचत. दि. १० जानेवारीला मिरवणूक काढून शरयुताई धोत्रे ह्यांनी वर्धा येथे सभा घेतली. त्यांनी सभेतील जनतेला विनंती केली की, जनतेने त्यांना थोड्याच दिवसात येणाऱ्या कार्यक्रमाचा अवलंब करुन सरकारला पंगू बनवावे. शरयुताईंना अटक करण्यात आली. त्यांच्या घराची झडती घेण्यात आली. पण त्यांना आक्षेपार्ह काहीच मिळाले नाही. त्यामुळे त्यांना सोडून देण्यात आले. पुन्हा त्यांची सत्याग्रह मोहिम सुरु झाली. त्यांनी १२ खेड्यांना भेटी दिल्या.

सुरवातीला त्यांच्या सभेला २० ते २०० पर्यंत उपस्थिती राहत असे. दौऱ्याच्या शेवटच्या काळात त्यांच्या भाषणाला ४०० ते ५०० लोक उपस्थित राहत असे. विशेषकरुन स्त्रियांची संख्या जास्त राहात होती. शरयुताई धोत्रे व दमयंतीबाई धर्माधिकारी यांना सरकारने अटक करुन ता. २ मार्च रोजी त्यांच्यावर खटला भरला. परंतु श्री कुंटे यांनी त्यांची सुटका केली. त्यानंतर पिपरी येथे त्यांनी सत्याग्रह केला. यावेळेस, पोलीसांनी त्यांना अटक करुन ता. २६ मार्च १९४१ रोजी त्यांना ६ महिण्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली. यावरुन हे स्पष्ट होते की, स्त्रियांकडे एकदा

जबाबदारी सोपविल्यानंतर त्या किती प्रामाणिकपणे ती जबाबदारी पार पाडू शकते. याचे उदाहरण म्हणजे शरयुताई आणि दमयंतीबाई धर्माधिकारी हे होय. यांच्यासारख्या कितीतरी स्त्रिया होत्या की, ज्यांच्या नोंदी नाहीत तरी सुद्धा ज्या स्त्रियांच्या नोंदी आहेत.त्यावरुन हे लक्षात येते की वर्धा जिल्ह्यातील प्रत्येक सत्याग्रहात आणि रचनात्मक कार्यात त्यांचा सहभाग मोठा होता हे यावरुन सिद्ध होते.

- **भारत छोडो आंदोलनाचा प्रारंभ :**

अखील भारतीय कॉंग्रेस समितीने मुंबईच्या ग्वालियाटँक मैदानावर ८ ऑगस्ट १९४२ ला 'भारत छोडो' ठराव पास केला. दुसऱ्या दिवशी पाहाटेलाच गांधीजीसंह कॉंग्रेस श्रेष्ठींना मुंबईत अटक होताच ९ ऑगस्टच्या सकाळीच 'भारत छोडो' आंदोलनास सुरुवात झाली. बरेच नेते मुंबईहून परत येत असतांना जळगाव येथे अटक झाली. विनोबा भावे आणि दादा धर्माधिकारी वर्ध्याला येताच ज्यांना पकडण्यात आले. रामकृष्ण व गोपाळराव काळेंनी वर्धा येथे प्रक्षुब्ध जमावाला आवरण्याचा प्रयत्न केला.परंतु देवळी येथील डाकघर व पोलीसठाणे पेटवून देण्यात आले. दिनांक १० ऑगस्ट रोजी वर्ध्यात मिरवणुका व निषेध सभांना जोर चढला. जनमत प्रक्षुब्ध झाले. दि. ११ ऑगस्टच्या दुपारी गोळीबारात जंगलु धोडंबाजी ढोरे पहिला हुतात्मा झाला. त्यामुळे लोक अधिकच प्रक्षुब्ध झाले. गांधीजींना अटक केल्याच्या निषेधार्थ वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा. ठाकुरदास बंग यांनी आपल्या प्राध्यापक पदाचा राजीनामा दिला. (११ ऑगस्ट) दिनांक १४ ऑगस्टपासून नवभारत विद्यालय ६ आठवडे बंद होते. तर कॉमर्स कॉलेज ४-५ महिने बंद राहिले. महिलाश्रम संस्था सुद्धा बंद होती. पण या संस्थेतील विद्यार्थीनी मात्र स्वयंस्फूर्तपणे या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. कॉमर्स कॉलेजमधील २०० पैकी ५० विद्यार्थ्यांना व १२ प्राध्यापकांपैकी सहा प्राध्यापकांना कारावास घडला. 'छोडो भारत' आंदोलनाने तिव्र रुप धारण केले. या आंदोलात स्त्रियांचा सहभाग मोठ्या संख्येनी वाढू लागला. १४-१५ वर्षाच्या मुलींपासून तर ६० वर्षाच्या म्हाताऱ्यापर्यंत सर्वांना अटक होत होती.

नालवाडी आश्रमातील श्रीमती राधाताई कुलकर्णी, लक्ष्मीबाई सोनार, मैनाबाई, शांतीबाई मवसीराम, चंद्रभागाबाई बाळकृष्ण हरिजन, नमुताई गोपाळराव सावरकर या स्त्रिया बेकायदेशिर सभेला उपस्थित राहिल्याबद्दल भा.स. १५४ नुसार ५६,४ आणि ३९(६) कलमाखाली

एम.एफ.सी. वर्मा यांनी प्रत्येकी सहा महिण्याची शिक्षा १९/१२/१९४२ रोजी दिली. या आंदोलनात मुली, स्त्रिया सिनेमागृहात पत्रके टाकणे, भिंती पत्रके चिपकवणे, बाजारात जाऊन पत्रके वाटणे अशा गोष्टी ज्या मुली हिम्मतवाण होत्या त्या मुली ही कामे करीत होत्या. ज्यांना मात्र हे काम जमत नव्हते, त्या मुली पत्रकांच्या नकला लिहून काढीत. त्याचबरोबर भूमिगतांना घरात आश्रय देणे, त्यांना सामग्री, निरोप पोहचविणे इत्यादी प्रकारची कामे त्या करीत होत्या. स्वांतत्र्याच्या सर्व लढ्यात ह्या लढ्याचे स्वरुप जास्त सखोल, तीव्र व राष्ट्रव्यापी होते. 'भारत छोडो' हे घोषवाक्य असलेल्या ह्या लढ्यात गांधीजीनी दिलेल्या 'करो या मरो' या मंत्राने प्रेरित झालेल्या हजारो सर्वसामान्य महिलाही या लढ्यात उतरल्या. या लढ्याचे वैशिष्ट्य हे की त्यांच्यापैकी कित्येकांनी साहसी कामे केली. भूमिगत लढ्यातील महिलांची कामगिरी अजोड राहीली.

- **भारत छोडो आंदोलन : महिलाश्रमातील मुलींचे कार्य प्रशंसनीय :**

जमनालाल बजाज यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली होती. त्यातूनच महिलाश्रमचा जन्म त्याग, तपस्या आणि बलीदान या तत्त्वावर झालेला होता. भारत छोडो या आंदोलनात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलांनी स्वांतत्र्य संग्रामात आपल्या समिधा टाकल्या. आश्रमवासी तुरुगांत गेल्यामुळे येथील स्त्रियांनी आपल्या पतीला, भावाला आणि मुलाला आंदोलनात जाण्यास प्रवृत्त केले होते. गांधीजीच्या आव्हानानुसार अनेक स्त्रिया घराबाहेर पडल्या. महिलाश्रमातील महिला सर्वाच्या समोर होत्या. शिस्तबद्धरितीने प्रभातफेरी वर्धा शहरातून दररोज काढत होत्या. "नही रखनी यह जालीम सरकार नही रखनी". तिरंगा झेंडा हाती घेऊन 'वंदे मातरम्' आणि 'झेंडा उचा रहे हमारा', विजयी विश्व तिरंगा प्यारा" हे राष्ट्रीय गीत ओजस्वी स्वरात गात वर्ध्याच्या रस्त्यावरुन फिरत होती आणि चळवळीचे वातावरण तेवत ठेवीत होती.

आंदोलन काळात व्यावहारीक दक्षता म्हणून महिलाश्रम ही शिक्षण संस्था ९ ऑगस्ट १९४२ ला बंद करण्यात आली. त्यामुळे महिलाश्रमातील काही महिला बजाजवाडीत राहु लागल्या. त्यात २६ मुलींचा समावेश होता. त्यामध्ये गोदावरी कोरडे, शांता व्यास, केसरबेन सुखाडे, भगवती ठाकूर, मालती बेले, हिरामणी शहा, प्रमिला देशमुख, मिरा तिडके, गिरीवाला

दास, राजमती, इंदिरा बहन, रुक्मिनी चांदुरकर, नयनतारा दत्त, सरोजिनी गोस्वामी, सुशिला गोयनका, सिताबहन राठी, शांता जाजू, शांता स्नेही, शंकुतला पालीवाल यांच्याशिवाय वासंती रामदासी, सरस्वती देवी, रमाबहन रुईया, राधाबाई कुलकर्णी, ताराबहन मनुवाला, मिरा शहा, जानकीदेवी बजाज, कुसूमताई लोहकरे, सावित्रीबाई बजाज, दमयंतीबाई धर्माधिकारी, शरयुताई धोत्रे, सुशिलाबाई जोशी, वेणूबाई चौधरी या सर्व विद्यार्थीनी, आणि त्यांच्या शिक्षिका व आश्रमवासी महिला यांनी १४४ कलम शहरात लागू असताना भीती न बाळगता पहाटेपासून लोकांना झोपेतून उठविणे, प्रभात फेरी आणि हस्तलिखीत बुलेटिन वाटने, लोकापर्यंत पोहचविणे इत्यादी साहसी कार्य अथकपणे केले. महिलाश्रमातील विद्यार्थीनी 'अंग्रेज भारत छोडो', 'जुलमी सलतनत नही रहेंगी', 'आझादी के लिये शहीद होंगे', पिली पगडी हाय हाय', 'पिली टोपी छोड दो', 'पोलीस हमारे भाई है'। सरकारी नोकरी छोड दो', असे नेहमीच घोषवाक्य म्हणून प्रभातफेरी काढणे सभा आयोजित करुन शहरात धुमाकूळ घालीत होत्या. म्हणून मॅजिस्ट्रेट पेंढारकर, यांनी पकडवारंट काढून अनेक महिलांना अटक केली आणि नागपूर व जबलपूर येथील तुरुंगात रवानगी केली होती.

महिलाश्रमातील स्त्रियांबरोबरच इतरही स्त्रिया या आंदोलनात सहभागी होऊ लागल्या. या स्त्रियांनी जुन्या रितीरिवाजांना तिलांजली देऊन पडदा पद्धत झिडाकरुन स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला. स्वातंत्र्य प्राप्तीच्या विचारापुढे वय, समाज, वर्ग आणि स्त्री पुरुष अशी सर्व बंधने झुगारुन सर्वच स्तरातील, वयातील स्त्रियांनी आंदोलनात भाग घेतला. आंदोलनात स्त्रियांचा वाढता सहभाग आणि शहरातील रस्त्यावरुन प्रभातफेरी काढून घोषणाबाजी सतत सुरु राहत होती. त्यामुळे अहमदी बेगम आझाद, मंजुळाबाई रामचंद्र गुळघणे, विमलाबाई शांताराम चित्रे, प्रतिभा वैकुंठराव देशमुख, जोहराबेन अकबर चावडा, झवेरबाई पुरुषोत्तम पटेल, मिराबाई दामोधर मुंदडा, अन्नपुर्णा, प्रसाद चौधरी, मालिणी दत्तात्रय दास्ताने, सुधा शांताराम चित्रे, सरस्वती मोतिराम धांदे , सिताबाई गणेश राठी, उषासिद्ध गोपाळ, वाजपेयी, जीजीबाई कुणबी, शांताबाई, अजणीबाई, काळीबाई, सुंगधाबाई, उषादेवी, कावेरी सेवाग्राम, मंजुळा तेली, सुरगाव, शांताबाई स्नेही (रोहीणी), मैनाबाई विठ्ठलराव मराठा(सेवाग्राम) (सर्व वर्धा तालुका) इत्यादी स्त्रियांनी चळवळीत भाग घेऊन तुरुंगवास पत्करला. महिलाश्रमाचे कार्यकर्ते आणि विद्यार्थीनींनी

विधायक कार्यातही स्वांतत्र्य लढ्याप्रमाणे बहुमोल कार्य केले. काही महिलांनी भूमिगत राहून कार्य केले.

वास्तविक 'छोडो भारत' ची मूळ संकल्पना हिंसात्मक नव्हती. पण सरकारने हिंसावादी या आंदोलनाला वळण दिल्यामुळे या आंदोलनास हिंसक वळण लागले. त्यामुळे सेवाग्रामचे आश्रमवासी, नालवाडी आश्रमातील स्वंयसेवक, व वर्ध्याच्या महिलाश्रमातील महिला देखील भूमिगत झाल्या. महिलाश्रमातील महिला चंद्रपूर, जबलपूर, व शिवनीपर्यंत त्या भूमिगत कार्य करीत होत्या. त्यातील आचार्य कमलाताई लेले सह ३०-४० मुली पकडल्या गेल्या, कमलाबाई तेरा महिने स्थानबद्ध होत्या. भूमिगत असलेल्या काही महिला व पुरुष घातपाती कार्यातही सामील झाल्या. महिलाश्रमात शिकलेली हसीना हैदरभाई ही मुस्लिम महिला विध्ववंसक कृत्यांना मदत करते या आरोपासाठी स्थानबद्ध होती. बंगालसारखी महाराष्ट्रात गुप्त संघटनेत स्त्रियांची नावे सहसा आढळून येत नाही पण विदर्भात मात्र अशा चोवीस स्त्रियांची नावे सापडतात. यावरुन हे लक्षात येते की, महात्मा गांधीनी जागृत केलेल्या या स्त्री शक्तीने स्वांतत्र्य लढ्यात तुरुंगवास घडलेल्या महिलांची संख्या ८० च्या जवळपास होती. संपूर्ण भारतात तुरुंगात गेलेल्या व्यक्तिच्या आणि महिलेच्या संख्येच्या दृष्टीने वर्धा जिल्ह्याचा नंबर हा वरचा लागतो. स्वातंत्र्य आंदोलनात तुरुंगात गेलेल्या स्त्रिया केवळ सुशिक्षित सुजाण शहरी स्त्रियाच नव्हत्या तर खेड्यापाड्यातील स्त्रियासुद्धा या आंदोलनात मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. त्यापैकी काही स्त्रियांना तुरुंगवास घडला. त्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**तुरुगांत गेलेल्या स्त्रियांची नावे**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | जानकीदेवी बजाज | १९. | रखमाबाई भुलकर | ३७. | पार्वतीबाई |
| २. | केशरबाई पोतदार | २०. | गंगुबाई रोडे | ३८. | अंबिकाबाई |
| ३. | दुर्गाबाई बजाज | २१. | राधाबाई मराठे | ३९. | सोनाबाई |
| ४. | चंद्राबाई पाठक | २२. | चंद्रभागाबाई मुंजे | ४०. | मंजुळाबाई |
| ५. | ललीताबाई चौरे | २३. | मनाबाई गोंड | ४१. | यशोदाबाई |
| ६. | नर्मदाबाई भय्या | २४. | अन्नपूर्णाबाई मीटकर | ४२. | कमलाबाई |
| ७. | मालतीताई थत्ते | २५. | मनाबाई सोनार | ४३. | लक्ष्मीबाई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८. | शांताबाई काळे | २६. | कमलाबाई कुणबी | ४४. | अनुसयाबाई |
| ९. | गंगुताई वाळुंजकर | २७. | कामिनीबाई वानखेडे | ४५. | पिलाबाई |
| १०. | लक्ष्मीबाई धानुका | २८. | उमाबाई कृष्णपती | ४६. | सिताबाई वाघ |
| ११. | शरयुताई धोत्रे | २९. | जानकीबाई मोरे | ४७. | कपुराबाई गौड |
| १२. | गीताबाई वेले | ३०. | सोनाबाई बागडदेव | ४८. | काशीबाई वाणी |
| १३. | राधाबाई कोष्टी | ३१. | सखुबाई जाधव | ४९. | सुभद्राबाई रोहणी |
| १४. | विमलाबाई जोग | ३२. | मनाबाई | ५०. | लक्ष्मीबाई देशमुख |
| १५. | सखुबाई तेली | ३३. | रंगुबाई | ५१. | सारजाबाई |
| १६. | आवडाबाई | ३४. | सोनाबाई | ५२. | तानाबाई सोनार |
| १७. | कुष्णाबाई चव्हाण | ३५. | भीमाबाई | ५३. | सखुबाई कोष्टी |
| १८. | गंगुबाई दुर्गे | ३६. | गजाबाई | ५४. | मनाबाई पुंजाराम वाद |
| ५५ | लक्ष्मीबाई बागडदेव | ६४. | सरस्वतीबाई | ७३. | पिलाबाई |
| ५६. | गंगुबाई कृष्णपती | ६५. | गयाबाई | ७४. | द्रोपदीबाई |
| ५७. | विठाबाई वंजारे | ६६. | कलाबाई गोंड | ७५. | राधाबाई |
| ५८. | रंगुबाई देशकर | ६७. | कमलाबाई सोनार | ७६. | चिमनाबाई |
| ५९. | लक्ष्मीबाई कावळे | ६८. | गंगुबाई | ७७. | गुणाबाई |
| ६०. | सखुबाई कोष्टी | ६९. | ताईबाई | ७८. | सरस्वतीबाई जुवाडी |
| ६१. | भागेरथाबाई मराठे | ७०. | लंकाबाई | ७९. | वायजाबाई |
| ६२. | साकुबाई आगलावे | ७१. | तानाबाई | ८०. | दमयंतीबाई धर्माधिकारी |
| ६३. | बयाबाई खरणकर | ७२. | सीताबाई | | |

**स्त्रोतः ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई.**

तुरुंगवास घडलेल्या स्त्रियांची संख्या यापेक्षाही जास्त आहे. पण ज्यांच्या नोंदी नाहीत त्यांची नावे आपण देऊ शकत नाही. तरीपण ज्यांच्या नोंदी आहेत त्यावरुन हे लक्षात येते की वर्धा तालुक्यातील स्वातंत्र्यांच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता.

■ **स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग असलेल्या महिला :**

स्वातंत्र्याच्या चळवळीत जिल्ह्यातील महिला मोठ्या संख्येनी सहभागी झाल्या होत्या. पण त्या सर्वांच्या नोंदी मात्र पूर्णपणे उपलब्ध नाही. पण ज्या महिला स्वातंत्र्य चळवळीत सक्रियपणे आघाडीवर होत्या. त्यामधील काही महिलांचा जीवनपट पुढीलप्रमाणे उलगडण्यात आला आहे.

- **जानकीदेवी बजाज**



जानकीदेवी विदर्भातील श्रेष्ठ स्वातंत्र्यसंग्रामसैनिक होत. त्यांनी १९२५ पासून ते स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंत अविरत देशसेवा केली. जानकीदेवीचा जन्म ७ फेब्रुवारी १८९३ ला जावरा या राजस्थानातील गावात झाला. त्यांच्या माहेरी, वडील गिरीधरलालजींचा अफूचा धंदा होता. घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. जमनालालजींना गांधीजींनी आपले ५ वे पुत्र मानले होते. त्यांनी स्वत:चा देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात तनमनधनाने झोकून दिले. त्यांच्या सहवासामुळे जानकीदेवीही स्वातंत्र्यसंग्रामात उतरल्या. १९३०-३२ च्या लढ्यात तर केवळ वर्धा किंवा वर्धेच्या परिसरातच नव्हे तर त्यांनी विलेपार्ले (मुंबई) छावणीत जाऊन आणि बिहारमध्ये जाऊन सुद्धा प्रचारकार्य केले

- **मालतीबाई थत्ते :**



मालतीबाई थत्ते विदर्भातील पहिल्या महिला सत्याग्रही होत. थत्ते दांपत्य वर्धा जिल्ह्यात प्रचारकार्याकरिता बरेच गाजले.

मालतीताईचे माहेर कोकणातील पाग गावाचे त्यांचा जन्म पाग ह्या गावी १९ मे १९१९ ला झाला. हे गांव चिपळूण तालुक्यात रत्नागिरी जिल्ह्यातील आहे. मालतीताईचे माहेरचे नांव मालती बेडेकर. वडील राष्ट्रीयवृत्तीचे होते. पुढे मॅटिक झाल्या. त्यांचे प्रेरणास्थान त्यांचे पतीच होते.

थत्ते दांपत्य वर्धेला आल्यावर मालतीताई विनोबांच्या सत्याग्रहाश्रमात दाखल झाल्या. महात्मा गांधी आणि पू. विनोबाजींच्या सहवासामुळे दांपत्याचा कायापालटच झाला. महिलाश्रम ह्या संस्थेत उभयतांनी १९३२ ते १९६८ पर्यंत शैक्षणिक, सामाजिक व राजकीय

कार्यकेले. त्यांनी वर्धा जिल्ह्यातील सर्वांगिण विकास कार्यावर तसेच स्वातंत्र्य आंदोलनावरही आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला दिसून येतो.

- **गंगुबाई वाळूंजकर :**



वर्धा जिल्ह्यात राष्ट्रीय प्रचारकार्य करणाऱ्या आश्रमवासी गंगुबाई गोपाळराव वाळूंजकर आणि माहेरच्या गंगु उधळीकर. त्यांचा जन्म ०८/०९/१९०९ ला सादवा विमोरा ह्या भुसावळजवळील खेड्यात झाला. शिक्षण चार वर्ग झालेले होते. राष्ट्रीय कार्यात आघाडीवर असलेल्या ह्या दांपत्याचा विवाह खादी कपड्यांवरच झाला. आयुष्यभर त्या खादीधारी होत्या. गोपाळराव ब्राम्हण असून महात्मा गांधींच्या प्रेरणेने त्यांनी वर्धेजवळ नालवाडी येथे चर्मालय उघडले होते. गंगुताई गुरे फाडण्याच्या कामात रात्री बेरात्रीसुद्धा पतीला मदत करीत.

१९३२ च्या कायदेभंग लढ्यात गंगुताई अन्य आश्रमवासी महिलां बरोबर वर्धा येथे पकडल्या गेल्या. वर्धेवरुन ८० महिलांची ६ महिन्यांकरीता नागपूर तुरुंगात बदली करण्यात आली होती. इतरांना फारशी अडचण नव्हती परंतु गंगुताईंना २।। वर्षाच्या मुलाला घेऊनच तुरुंगात जावे लागले.

- **सावित्रीबाई बजाज :**



सावित्रीदेवींचा जन्म १९१९ सालचा. उर्मिलादेवी आणि लक्ष्मण्धाप्रसाद पोद्दारांचा ह्या कन्या. शिक्षण कान्व्हेंट शाळेत मॅट्रीकपर्यंत झाले. जमनालाल बजाजांचे पुत्र कमलनयन बजाजांच्या ह्या पत्नी. संपूर्ण बजाजपरिवारच १९२० पासूनच राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेला होता. १९४१/२ च्या 'भारत छोडो लढ्यात' ह्या सहभागी झाल्या. झेंडा लावण्याकरीता त्या लहान काठी आणि झेंडा घेऊन जात आणि ठराविक ठिकाणी अन्य दिशांनी मुली येत, झेंडा लावीत आणि भाषणाला सुरुवात होत असे.

- **शरयुताई धोत्रे :**



शरयुताई धोत्रेंचा जन्म १९१०मध्ये पूर्व खानदेशामध्ये झाला. त्यांचे वडील अण्णासाहेब दास्ताने प्रख्यात वकील होते. घरची परिस्थिती चांगली होती. महात्मा गांधीच्या हाकेला 'ओ' देऊन त्यांनी

पूर्णवेळ देशकार्य सुरु केले. इ. स. १९२६ पासून त्या विदर्भात वर्धेला आल्या. वर्धा येथील महिलाश्रमातील मॅट्रिक (वनिता) ही परिक्षा पास केली. हिंदी कोविदही झाल्या. १९२६ साली आश्रमपद्धतीने वर्धा येथेच त्यांचे लग्न झाले.

शरयुताई प्रेरणास्थान त्यांचे वडीलच होते. सेनापती बापट, महात्मा गांधी अशा अनेक पुढाऱ्यांशी माहेरी लहान असतांना संपर्कात असल्यामुळे त्या सर्व व्यक्तिचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या घडणीवर पडला. ह्या व्यक्तींच्या व्याख्यानांची दवंडी त्या स्वत: देत असत. १९१९ पासून त्यांना गांधीजींचा सहवास लाभला.

**१९२१ चे असहकार आंदोलन :** वडीलांनी वकीली सोडली. भावंडांनी शाळा सोडल्या. अमीरीतून फकिरीत प्रवेश झाला. १९२२ मध्ये प्रथम घरच्या विदेशी कपड्यांची होळी, नंतर घरोघरी जाऊन विदेशी कपडे आणण्याचे काम केले व दारूगुत्यावर निरोधने केली. १९२३ मधील झेंडा सत्यग्रहाचे वेळी घरी स्वयंसेवकांची भरती सुरु असायची. १९३२ मध्ये जंगल कायदा मोडल्याबद्दल त्यांना ६ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली.

- **दमयंतीबाई धर्माधिकारी :**



जन्म १९२० मध्ये मिरापूरकर परिवारात झाला. त्यांचे मूळ गाव वर्धा होते. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यत झाले. त्यांचे प्रेरणास्थान महात्मा गांधी होते. १९४२ मध्ये पहिल्या वैयक्तिक सत्याग्रही म्हणून दमयंतीबाई धर्माधिकारी आणि शरयुताई धोत्रे या बजाजवाडी परिसरातील दोन महिला आणि पूज्य विनोबा भावे यांची निवड झाली. वैयक्तिक सत्याग्रह हा महात्मा गांधींच्या सत्याग्रहाचा उच्चांक होता. सत्याग्रहाच्या तत्वावर विश्वास असलेल्या शेलक्या निवडक कार्यकर्त्यांनाच परवानगी मिळू शकत होती. सत्याग्रहाच्या काळात दमयंतीबाईंना ३-४ महिने लागोपाठ पायी फिरावे लागत असे. जागोजागी भाषणे द्यावी लागत. त्यांना सर्वात शेवटी पकडण्यात आले. ६ महिन्यांची शिक्षा झाली. १९४२ मध्ये त्या तुरुंगातून बाहेर आल्या. परंतु प्रकृती बिघडलेली होती.

दमयंतीबाईनास १९४२ मध्ये अटक झाल्यावर त्यांनी कोर्टांत बयान दिले. स्त्रियांच्या भावना दर्शविणारे असे हे बयानातील काही अंश -'एरवी सार्वजनिक कामात भाग न घेणाऱ्या व राजकारणात मुळीच गोडी नसलेल्या माझ्यासारख्याच गृहनिष्ठ व कौटुंबिक वृत्तीच्या स्त्रीलाही महात्मा गांधींनी सुरु केलेल्या या पवित्र चळवळीत भाग का घ्यावासा वाटला, हे नम्रपणे सांगू इच्छिते.

# प्रकरण सातवे

# मूल्यमापन व निष्कर्ष

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा अभ्यास करताना वर्धा जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या कामगिरीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. या चळवळीतील स्त्रियांच्या राजकीय व सामाजिक सहभागाला एक वेगळे परिणाम प्राप्त झाले. म. गांधींच्या अहिंसात्मक चळवळीमुळे स्वातंत्र्याच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग वाढला, तर दुसरीकडे सामाजिक व राजकीय जागृतीमुळे स्त्रियांच्या संघटना उभ्या राहिल्या. सत्याग्रहासाठी आवश्यक असलेले धैर्य, सोशिकता आणि आत्मिक सामर्थ्य या विशेष गुणांमुळे स्वातंत्र्य लढ्यात स्त्रिया महत्वाची कामगिरी बजावू शकतील .या गांधीजींच्या प्रेरणेमुळेच अनेक स्त्रिया अहिंसक लढ्यात सहभागी झाल्या. अशा या भारतातील स्वातंत्र्य चळवळीत वर्धा जिल्ह्याचे स्थान अनन्यसाधारण आहे. म. गांधी व आचार्य विनोबा यांच्या वास्तव्याने पुनित झ्‍ालेले वर्धा-सेवाग्राम म्हणजे तत्कालिन भारताची अशासकीय राजधानी होती. भारताचे भवितव्य घडविणारे अतिशय महत्वाचे निर्णय या पवित्र परिसरात घेण्यात आले. त्यामुळे आजही महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण देशात या जिल्ह्याला स्वातंत्र्य चळवळीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळेच संशोधकाने 'वर्धा तालुक्यातील स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचा राजकीय व सामाजिक सहभाग-एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधन करुन संशोधनकर्त्याला दुय्यम स्त्रोतांच्या उपयोगावरुन पुढील निष्कर्ष प्राप्त झाले आहेत.

१. ज्या पुरुष प्रधान संस्कृतीने स्त्री-पुरुष समानता मान्य केली नाही, त्या पुरुष प्रधान संस्कृतीला छेद देण्याचे कार्य म. गांधींनी केले. स्त्री पुरुषापेक्षा काटक असते आणि म्हणून स्त्रीकडे एखादी जबबदारी सोपवली तर निष्ठेने, जिद्दीने, यशस्वीपणे पार पाडू शकते हा महात्मा गांधींचा स्त्री विषयक दृष्टिकोन केवळ ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचा आहे असे म्हणता येणार नाही तर वर्तमान व भविष्यातही स्त्री सक्षमीकरणासाठी केवळ जिल्ह्याला नव्हे तर संपूर्ण देशाला प्रेरणादायी ठरणार असल्याचे सिद्ध ाीते. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीतील लक्ष वेधून घेणारी बाब म्हणजे महिलांच्या दृष्टिकोणात म. गांधींनी घडविलेली क्रांती होय. पडदानशील असलेल्या महिला देखील या चळवळीत सामील

झाल्या. प्रभात फेऱ्यांमध्ये प्रामुख्याने महिला भाग घेत असत. परदेशी कापड दुकानांवरील निरोधनाचे श्रेय त्यांनाच जाते. तालुक्यातील जानकीदेवी बजाज, गंगुताई वळुंजकर, शरयु धोत्रे, मालती थत्ते, विमल जोग, विमल अभ्यंकर इत्यादी महिलांनी जनजागृतीबरोबर सत्याग्रही स्वयंसेवक संघटित करण्याचे महत्वाचे कार्य पार पाडले. त्यांच्या कार्यामुळेच स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली.

२. महात्मा गांधींच्या राजकीय क्षितीजावरील उदयानंतर स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय सहभागाला एक वेगळे परिणाम प्राप्त झाले. एकीकडे गांधींच्या अहिंसात्मक चळवळीमुळे स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग वाढला, तर दुसरीकडे सामाजिक व राजकीय जागृतीमुळे स्त्रियांच्या संघटना उभ्या राहिल्या. सत्याग्रहासाठी आवश्यक असलेले धैर्य, सोशिकता आणि आत्मिक सामर्थ्य या विशेष गुणांमुळे स्वातंत्र्य लढ्यात स्त्रिया महत्वाची कामगिरी बजावू शकतील या गांधीजींच्या प्रेरणेमुळेच अनेक स्त्रिया या अहिंसक लढ्यात सहभागी झाल्या. जंगलतोड कायद्याला विरोध, परदेशी कापडांची होळी, खादी आणि स्वदेशीचा प्रचार, दारु दुकानांवर बहिष्कार इत्यादी सर्व नि:शस्त्र प्रतिकाराच्या चळवळीत विशेषत: १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत व १९४२ च्या चलेजाव चळवळीत स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. स्त्रियांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग एक व्यापक आंदोलनाचा भाग होता. स्वातंत्र्य चळवळीपेक्षा विभक्त अशी स्त्रियांची चळवळ तोपर्यंत विस्तारित झालेली नव्हती. त्यामुळे या चळवळीत स्त्रीच्या माणूस म्हणून जगण्याच्या हक्काला अधिमान्यता मिळाली. स्त्री आत्मभान व समाजभान जागृत झाले. स्त्री-पुरुष समानता आणि स्त्रियांचे व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांचे बीजारोपण याच काळात झाले.

३. भारतीय राजकारणात महात्मा गांधींचा प्रवेश झाला तेव्हा काँग्रेसच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग अतिशय तुरळक व प्रतिकात्मक स्वरुपाचा होता. स्त्री-शिक्षण, कुटूंबांतर्गत अत्याचार व दुष्ट रुढींना विरोध या प्राथमिक पातळीच्या पुढे सरकलेल्या दिसत नव्हता. अर्थात तोपर्यंत केवळ समाज धुरिणांमध्ये आणि वरिष्ठ सामाजिक वर्तुळामध्ये साधक बाधक चर्चेचा विषय ठरलेली स्त्री समस्यांचा विषय थेट जनसमुदायामध्येच म. गांधींनी नेऊन ठेवला. अगदी स्त्रियांच्या मुलभूत मानवी अधिकारापर्यंतच्या समग्र स्त्री स्वातंत्र्याच्या

भूमिकेवर अत्यंत निसंदिग्धपणे सार्वजनिक ठीकाणी नेण्याचे श्रेय म. गांधींनाच आहे. यासाठी त्यांनी थेट स्त्रियांशीच संवाद साधला. आश्रमवासी स्त्रिया, विद्यार्थीनी, महिला मंडळे, जाहिर संभाना आलेल्या स्त्रिया इत्यादींशी प्रत्यक्ष संवाद, भाषणे, पत्रे, नियतकालिकांमधून लेख वर्तमान पत्रातून लेखन या विविध मार्गांनी स्त्रियांशी संपर्क साधून स्त्रियांमधील सुप्त क्षमतांना फार मोठी संधी महात्मा गांधींनी उपलब्ध करुन दिली.

४. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय भावनेचे बिजारोपण होऊ लोगलेली स्त्री गांधीयुगात पुरुषांच्या बरोबरीने पण स्वतंत्रपणे कार्याला सिद्ध झाल. १९२० सालापर्यंत सार्वजनिक क्षेत्रात कार्य करण्याची स्त्रियांना कोणतीही संधी नव्हती. ज्यांना होती ती उच्चवर्गापूरती मर्यादित होती. त्याचे स्वरुप महिला मंडळात जाणे, तेथे समाज सुधारणा व स्त्री उन्नतीवर चर्चा करणे एवढ्यापुरतेच सिमीत होते. १९२० साली गांधींनी पुरस्कृत केलेला असहकाराचा कार्यक्रम अहिंसक व शांततापुर्ण मार्गानी राबविण्यावर गांधीजींचा भर होता. हा कार्यक्रम राबविण्यात स्त्रियांनी पुढे यावे असे आवाहन गांधीजी आपल्या भाषणातून वारंवार करीत होते. त्यांना स्त्रियांमधील सुप्त शक्तीची खात्री होती. त्या दुर्बल अथवा अबला नसून त्यांची आत्मिक शक्ती बळकट आहे. अहिंसा, प्रेम, संयम, सहनशिलता, त्यागाची सिद्धता, अन्यायाविरुध्द आत्मिक बळाने प्रतिकार करण्याचे मानसिक धैर्य त्यांच्यात आहे हे गांधींनी ओळखले होते. त्यामुळेच दिर्घ निद्रावस्थेतून स्त्रिया जाग्या होऊन त्या कार्यरत झाल्या. वर्धा येथे स्थापन झालेल्या महिलाश्रमातील मुलींनी सुद्धा या चळवळीत मोठा सहभाग नोंदविला. स्त्रियांना जर संधी मिळाली तर त्या अधिक चांगली भूमिका वठवू शकतात असा विश्वास स्वातंत्र्य चळवळीने पुरुषांनाही दिला.

५. स्वातंत्र्य चळवळीच्या निमित्ताने स्त्रियांचा राजकीय व सामाजिक क्षेत्रात सहभाग वाढला. परिणामस्वरुप राजकीय जाणीवा वाढायला लागल्या त्यापेक्षाही जास्त सामाजिक जाणीवा वाढण्यास मदत झाली. फार मोठ्या संख्येने स्त्रिया संघटित झाल्याने रुढी परंपरेचे बंधन शिथील झाले. व्यापक सामाजिक दृष्टिकोन त्यांना प्राप्त झाला. त्याचबरोबर स्त्रिया राष्ट्रीय आंदोलनाशी फार जवळून निगडीत झाल्यामुळे त्यांना पुढे राजकारणात सहभागी होणे,

मतदानाचा हक्क आणि इतर घटनात्मक हक्क मिळणे सोपे झाले. त्यामुळे भारतीय स्त्रीला या हक्कासाठी लढावे लागले नाही. स्त्रियांच्या विचारपद्धतीत आणि त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनात महत्वाचे बदल या चळवळीच्या निमित्ताने झाले. ही या चळवळीची मोठी उपलब्धी आहे.

६. स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाने स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणाची पार्श्वभूमी तयार करण्यास फार मोठी मदत झाली आहे. आपल्या प्रश्नांचा व्यापक राजकीय, सामाजिक संदर्भात विचार करावा आणि त्या संदर्भात ते प्रश्न कसे हाताळावेत याची शिकवण या चळवळीने स्त्रियांना मिळाली. स्वातेत्र्याच्या चळवळीतील सहभागामुळे स्त्रीला स्वत्वाची ओळख निर्माण झाली. त्यांच्यामधला आत्मविश्वास वाढला. नेतृत्व गुणांचा विकास होण्यास मदत झाली. त्यांची लोपलेली अस्मिता जागृत झाली. वर्धेत जानकीदेवी बजाज, कस्तुरबा ह्यांचे नेतृत्व जिल्ह्यातील स्त्रियांना प्रेरणादायी ठरले. त्यामुळेच वर्धा जिल्हा इतर जिल्ह्याच्या तुलनेने लहान असून या जिल्ह्यातील स्त्रिया स्वातंत्र्याच्या चळवळीत आघाडीवर होत्या. त्यांच्या व्यक्तिविकासाचा पाया स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या सहभागाने घालून दिला. महिलांच्या जीवनाला नवी कलाटणी देण्याचे कार्य स्वातंत्र्य चळवळीने केले.

७. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी झालेल्या भिन्न जातीच्या, धर्माच्या, भिन्न वयोगटातील सुशिक्षित व अशिक्षित महिला होत्या. स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या सहभागाची व कार्याची बुज पुरुषांनी राखली. राष्ट्रीय नेत्यांनी अनेकदा त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. स्त्रियांच्या सहभागामुळे भारताचे स्वातंत्र्य जवळ आले असे मत त्यावेळेस व्यक्त केले जात होते. सर्वसामान्य पुरुषांनाही स्त्रियांबाबतचा आपला परंपरागत दृष्टिकोन बदलावा लागला. पुरुषांनाही येथील स्त्री मागासलेली, कर्तृत्वहीन नाही याची खात्री पटली. त्यामुळे त्यांच्या कार्याचे चीज व मोल होऊ लागले. स्वातंत्र्य चळवळीत काम करताना स्वत:साठी कोणत्याही सवलती त्यांनी मागितल्या नाही. कोणतेही काम करण्यास माघार घेतली नाही. काही महिलांनी तर आपल्या कुटूंबातील पुरुषांना राष्ट्रीय कार्यास प्रवृत्त केले. त्यांच्याकडे जी जबाबदारी सोपविण्यात आली ती त्या प्रामाणिकपणे पार

पाडीत होत्या. शरयुताई धोत्रे आणि दमयंतीबाई धोत्रे यांचेकडे वैयक्तिक सत्याग्रही म्हणून गांधींनी जबाबदारी सोपविली होती. त्यांनी तुरुंगवासाची अथवा प्राणाची पर्वा न करता धडाडीने कार्य केले. त्यांच्याबरोबर अनेक स्त्रियांनी आपले कतृत्व व क्रियाशिलता या चळवळीतून सिद्ध केली.

८. स्वातंत्र्य आंदोलनाने स्त्रियांना जरी आंदोलनात भाग घेण्यास संधी दिली असली तरी त्या निमित्ताने स्त्रियांच्या सर्वच प्रश्नाकडे लक्ष पुरविले असे म्हणता येत नाही. स्त्रियांचे कुटूंबातील हक्क केवळ पत्नी आणि माता ह्या मर्यादित पारंपारिक भुमिकेविषयी निषेध किंवा कुटुंबातील पारंपारिक सत्तासंबंध किंवा पुरुषांनी ठरविलेली मूल्यपद्धती या प्रश्नांकडे स्वातंत्र्य आंदोलनात प्रकर्षाने लक्ष दिल्याचे दिसत नाही. एवढेच नव्हे तर या आंदोलनातून पुरुषांकडून स्त्रियांवर होणाऱ्या दडपशाहीपासून स्त्रियांचे लक्ष विचलीत झाले. या प्रश्नांकडे गांभिर्याने लक्ष दिल्याचे दिसत नाही. असा आरोप स्वातंत्र्याच्या चळवळीवर केला जातो. पण हा आरोप तथ्यांना धरुन दिसत नाही. उलट शेकडो वर्षे घराच्या चार भिंतीत कोंडल्या गेलेल्या स्त्रियांना घराच्या बाहेर काढून पुरुषांबरोबर कार्य करण्याची म. गांधींनी या चळवळीच्या निमित्ताने त्यांना सुवर्ण संधी उपलब्ध करुन दिली. त्यामुळे स्त्री सुद्धा एक माणूस आहे आणि माणूस म्हणून जगण्याच्या हक्काला या चळवळीमुळे अधिमान्यता मिळाली. म्हणून डॉ. भा. ल. भोळे म्हणतात. "परंपरेने स्त्रियांना ज्या कारणांमुळे दुय्यम ठरवले होत, त्यांचीच मांडणी गांधींनी स्त्रियांच्या श्रेष्ठत्वाची साधने" अशी केली आणि हे पटवून दिले की, अनेक बाबतीत स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक उत्तम प्रकारे सार्वजनिक कामाच्या जबाबदाऱ्या पेलू शकतात. त्यामुळे स्वातंत्र्याच्या आंदोलनात सर्वच प्रश्नांची जरी दखल घेण्यात आली नाही तरी सुद्धा सार्वजनिक जीवनात स्त्रिया अधिकाधिक प्रमाणात सहभागी होत असलेले दिसणे आणि व्यवस्थापकीय स्तरावर त्यांना जास्त प्रतिनिधित्व मिळणे हे स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्वाचे ठरले आहे. त्यानंतरच्या स्त्री संघटनांना लढण्यासाठी या चळवळीने स्त्रियांच्या मानवी हक्कांसंधीची एक नवी दिशा दिली आहे.

९. स्वातंत्र्याच्या चळवळीत स्त्रियांनी सहभागी व्हावे यासाठी गांधी पुरुषांपेक्षा स्त्री कशी श्रेष्ठ आहे हेही समजून सांगत होते. त्यासाठीच त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. स्त्री व

पुरुष तत्वत: समान आहेत. स्त्रिला स्वत:चे व्यक्तिमत्व आहे. तिला पुरुषांइतकीच निसर्गाकडून मानसिक शक्तीची देणगी मिळाली आहे. त्याग, सोशिकता, कष्टाळूपणा या बबातीत ती पुरुषांपेक्षा काकणभर श्रेष्ठ आहे. अहिंसक झगडा करण्यास तिच अधिक लायक आहे. तिलाही पुरुषांइतकेच अधिकार असले पाहिजेत. स्त्री ही पुरुषांच्या मालकीची भोगवस्तू नाही. आपण पुरुषांचे खेळणे आहोत असे समजणे ही तिची मोठी चूक आहे स्वत:विषयीची न्युनगंडाची भावना सोडून देऊन कुटूंबातील व समाजातील आपले स्थान मिळविण्यास स्त्रियांनी पुढे सरसावले पाहीजे ही गांधींची शिकवणूक होती. स्त्रियांना आपल्या आत्मभानाची जाणीव व्हावी, त्यांच्यातील माणूसपणाचे भान जागृत व्हावे यासाठी गांधींनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. भारतीय स्त्री गुलामगिरीचे आयुष्य जगत आहे. याची सार्थ जाणीव गांधीजींना होती. त्या दृष्टिने स्त्रियांच्या प्रश्नांचे विश्लेषण केले व त्याच आधारावर स्त्रियांना घराच्या बाहेर काढून स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी करुन घेतली. त्यांनी देखील आपली कर्तृत्वक्षमता सिद्ध करुन दाखविली. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अतिशय सक्षमपणे ब्रिटीशांच्या विरुद्ध लढा दिला. यातच खरी स्त्रीची सक्षमता सिद्ध होते.

## १९४२ च्या भारत छोडो स्वातंत्र्य आंदोलनात महिलांचा सहभाग





# संदर्भग्रंथ सूची


- **मराठी**

| | | |
|---|---|---|
| बैस, विरेंद्र गोपालसिंग | : | वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास (१९२०-१९४७) मंगेश प्रकाशन, नागपूर २००५ |
| भोळे भास्कर लक्ष्मण | : | स्त्रियांची क्षितिजे किती विस्तारली, खेमराज हिरेखण स्मृती गौरव ग्रंथ १९९४ |
| भारदे बाळासाहेब (संयोजक) | : | वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, प्रकाशक, ऑगष्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई १९९४ |
| भागवत विद्युत | : | स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पूणे, ८ मार्च २००४ |
| भगत रा. तू. | : | महात्मा जोतिराव ते कर्मवीर भाऊराव, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर १९७३ |
| भांडारकर पु. ल. | : | सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर १९८७ |
| देशमुख शारदा | : | शिवशाहीतील व पेशवाईतील स्त्री जीवन |
| धर्माधिकारी दादा | : | स्त्री-पुरुष सहजीवन, परधाम प्रकाशन, पवनार २००१ |
| धर्माधिकारी तारा | : | स्वातंत्र्य लढ्यातील स्त्री, ऑगस्ट क्रांती महोत्सव समिती मुंबई |
| फाटक न.र. | : | स्वातंत्र्य सैनिक, चरित्र कोश खंड १ |
| गवाणकर रोहिणी | : | मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रुप, आदित्य प्रकाशन, पुणे २००६ |
| कडवे रघुनाथ | : | आष्टी स्वातंत्र्य संग्राम |
| पाटील पंढरीनाथ सिताराम | : | महात्मा जोतिराव फुले यांचे चरित्र, रघुवंशी प्रकाशन, शुक्रवारी पेठ, पुणे |
| परदेशी प्रतिमा | : | डॉ. आंबेडकर आणि स्त्री मुक्ती विचार, दिग्जाक प्रकाशन, कसबा पेठ, पुणे-११ ५ फेब्रुवारी २००५ |
| पाठक दमयंती | : | वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन, नागपूर - २००३ |
| संपादक | : | राष्ट्रसेविका व मावशी, गौरव विशेषांक, १९६४ |
| संपादक | : | स्त्री जीवन, गांधी विचार दर्शन, खंड सहावा |
| सहस्त्रबुद्धे, शिरीष, | : | बखर काँग्रेसची, राजहंस प्रकाशन, सदाशिवपेठ, पुणे, १९८५ |

- गांधी महात्मा, : माझ्या स्वप्नाचा भारत, परमधाम प्रकाशन, पवनार, १९६०
- बजाज जानकीदेवी, : माझी जीवन यात्रा, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई १९६०
- पट्टाभिसिता रामय्या : कॉंग्रेसचा इतिहास गो.आ.देशपांडे, २९१ शनिवार पेठ, पुणे-२ १९३५
- शिंदे, ताराबाई : लिखीत स्त्री - पुरुष तुलना, प्रकाशक सुधीर गवळी
- ठाकरे, अनिल : विकासाची वाटचाल, वर्धा २००५, गणेश नगर, जि. वर्धा, जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा
- वाळुंजकर, गोपाळराव राजाराम, : ग्रामसेवा मंडळाचा इतिहास
- विनोबा, स्त्री-शक्ती, : परधाम, पवनार (वर्धा) १९९९
- चौधरी कि.का, : महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, वर्धा जिल्हा १९९२
- महाराष्ट्र साप्ताहिक : ता. १५ जुन १९३०
- महाराष्ट्र साप्ताहिक : ता. ४ सप्टेंबर १९३०
- गवाणकर, रोहीणी : राजकारणातील खास चौघी, इंडर्स सोर्स बुक, मुंबई-२०१६
- डॉ. पाटील मधुकर चौधरी, रमाकांत : भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०११
- डॉ. बोबडे, विजय : स्त्री सत्तेचा सूर्योदय, वेद मुद्रा प्रकाशन, अमरावती, २०१६
- डॉ. पाटील, डी.डी. पाटील, डी.बी. : गांधीजींची युवकांसाठी विचारधारा, अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०११
- डॉ. राणे, एस.एस. पवार, दिपक : कर्तृत्ववान स्त्रियांची यशोगाथा, कुमुद पब्लिकेशन जळगाव, २०१५
- माशेलकर, रघुनाथ (संपा) : अखंड प्रेरणा गांधी विचारांची, सकाळ प्रकाशन, २०११
- डॉ. फडतरे, सुभाष : भारतीय स्वातंत्र्य लढ्यात पुणे जिल्ह्याचे योगदान (१९२०-१९४७), डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१३
- डॉ. कर्वे, स्वाती : स्त्री परिषदांचा इतिहास (१८२५०-२०००),अभिजित प्रकाशन, पुणे, २०१५.
- डॉ. महाजन, वंदना : स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन, अथर्व पब्लिकेशन, धुळे
- डॉ. महाबळ, किशोर : स्वातंत्र्य आंदोलनातील सांस्कृतिक राष्ट्रवाद, विसा बुक्स २०१२

- बसु, रुतकी : आंतरराष्ट्रीय राजकारण, संकल्पना, सिध्दांत आणि संकल्पना, सेज पब्लिकेशन, न्यु दिल्ली
- डॉ. गठाळ, एस.एस. : भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैशल पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१७
- झिना, ओलियर : संशोधन प्रकल्प कसा असावा? सेज पब्लिकेशन, न्यु दिल्ली
- प्रभु, आर. के. राव, यु.आर. : महात्मा गांधींचे विचार (संपा), नवजीवन मंदीर प्रकाशन, अहमदाबाद
- डॉ. देशमुख, अलका : विविधांगी आयामातून स्त्री, श्री साईनाथ, प्रकाशन, नागपूर (२०११)
- मोदी, नवाझ (संपा.) : भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रिया, मेहता पब्लिशिंग हाऊस, २००३.
- डॉ. भास्कर, व्ही.व्ही. : महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर विचारधारा, अथर्व पब्लिकेशन, २०१२
- डॉ. डोंगरदिवे, वासुदेव : महात्मा गांधी आणि सत्याग्रह, अलंकार पब्लिकेशन, २०१६
- सुमंत, यशवंत : महात्मा गांधींची विचारदृष्टी, साधना प्रकाशन, पुणे, २०१७

हिन्दी

- आंबेडकर, भिमराव रामजी : हिंदु नारी का उत्थान और पतन, भाषांतरकार श्री वर्धनजी, प्रथम संस्करण.
- गांधी, एम.के. : हिन्द स्वराज (रि.ए.) नवजीवन पब्लिक हाऊस
- श्रीवास्तव, शैलेंद्र : स्वंतत्रता आंदोलन का इतिहास, साहित्य-निधी, प्रकाशन, दिल्ली, १९९४
- व्होरा, आशाराणी : भारतीय नारी, दशा और दिशा, नेशनल पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली,१९८३
- विनोबा सप्त शक्तियाँ : सर्वसेवा संघ प्रकाशन, राजघाट वाराणशी
- अग्रवाल श्रीमन्नारायण : 'काँग्रेसजनो के लिये रचनात्मक कार्यक्रम', अखील भारतीय काँग्रेस कमिटी, नई दिल्ली
- अवधप्रसाद : 'रचनात्मक कार्य और संस्थाएँ' म. गांधी, स्मारक, नीधी, राजघाट नई दिल्ली १९७३
- जाजू श्रीकृष्णदास : " अखील भारतीय चरखा संघ का इतिहास" सेवाग्राम, १९५०

- बलवंतसिंग, : 'बापु की छाया में ', १९५७
- मगन संग्राहलय के चालसवर्ष : मगन संग्रहालय, समिती मगनवाडी, वर्धा १९६७
- मजूमदार, धीरेंद्र : "समग्र नई तालीम" सर्वसेवा संघ, राजघाट , वाराणसी १९६२
- सहस्त्रबुध्दे, अ.वा. : "सेवाग्राम की रचनात्मक संस्थाए" अ. भा. सर्व सेवा संघ प्रकाशन' राजघाट, काझी
- व्होरा, आशाराणी : महिलाएँ और स्वराज्य, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, १९२०
- तिवारी, कनक : हिंद स्वराज का सच, सस्ता साहित्य मंडल, प्रकाशन, नई दिल्ली, २०१०
- प्रो. आराधना : महात्मा गांधी के विचार और वर्तमान विश्व, राहुल पब्लिकेशन हाऊस, मेरठ, २०१५
- सुजाता (संपा.) : बापू और स्त्री, सव सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी, नई दिल्ली.
- त्रिपाठी, बिपीनचंद : स्वतंत्रता संग्राम, राष्ट्रीय पुस्तक न्यास भारत, २०१४
- सिंह, मिनाक्षी : स्वतंत्रता संग्राम और महिलाएँ, ओमेगा पब्लिकेशन, २०१३
- बाला, सरोज : स्वतंत्र भारत का इतिहास, ओमेगा पब्लिकेशन,२०११
- शर्मा, रमा : मिश्रा, एम.के. महिलाओंके, मौलिक अधिकार, अर्जून पब्लिशिंग हाऊस, २०१६
- धर्माधिकारी, चंद्रशेखर : गांधी मेरी नजर में, गांधी विचार परिषद, गोपूरी, वर्धा, २०११

**English**

- Altekar, A.S. : The Position of women in Hindu civilization Publication,House, Banaras Hindu, University, 1983
- Agrwal Shrimannarayan : Vinob his life and work, Popular publication, Bombay, 1970
- Ali Asaf Aruna : Women movement in India , 1975
- Desai Neera : Women and society in India Ajanta Publication, 1987
- Joshi, Pushpa Girishkumar : Gandhi on women’s Navjivan Publising House Ahamadabad, 1988
- Mujumdar, R.C. : Strggle for freedom, May 23 , 1929

- Dwarkadas Kanji : Ten years to freedom , 1938-47, Popular prakashan, Mumbai, 1968
- Nanda B.R. : Wardha in India's freedom struggle Maharashtra Board of literature & culture Bombay, Oct. 1986
- Kalekar , Kaka : Gandhian Capitalist Jamnalal Trust, Wardha
- Munsi, Dr. R.M. : Struggle for freedom, Bhartiya Vidha Bhavan , Bombay.
- Maharashtra State : Wardha District, The Director Govt. Publishing, M.S. Bombay, 1929
- Russal, R.V. : Wardha District Gazetteer volu. A Poineer Press Allahabad, 1906
- Pawar, M.R. : Women Empowerment Issues and Challenges, Gaurav Books Kanpur, 2016
- Sahni, S.K. : Empowerment of Women Emerging Dimension, Astha, Publisher, New Delhi, 2015
- Pawar, Murlidhar : Encyclopaedia of Women And Human Rights, Chandralok Prakashan Kanpur, 2017


**नियतकालीक लेख्र : (Periodical Articles)**


- भागवत, विद्युत : सक्षमीकरण: संकल्पना आणि व्यवहार, महिला सबलीकरण विशेषांक, पुणे विद्यापीठ, पुणे-२०११
- देशमुख्र स्नेहलता : महिला सक्षमीकरणाचा एकसूत्री कार्यक्रम, लोकराज्य, ऑक्टो, नोव्हे. २००३
- गोटे, शुभांगी : महिलांचा राजकारणातील सहभाग, आंतरराष्ट्रीय आकलन समाजशास्त्र, संशोधन पत्रिका, मार्च १९९८
- गोरडे, वासुदेव : महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण १९९४-२००१ एक प्रवास यशमंथन, महिला विशेषांक, जानेवारी - मार्च १९९८
- कुबडे, म.वी. : महिलांचा राजकारणातील सहभाग, योजना, मे १९९८
- लेले- कोतवाल, मेधा : सामुहिक ओळख्र ही स्त्रियांची ताकद, राजसत्तेतल्या कारभारणी, विशेषाक, २००४
- महाजन सूमित्रा : स्त्री सबलीकरण तत्वज्ञान, ध्येय व उद्दिष्टपूर्ती, योजना २००१
- पाटील, भारती : स्त्रियांच्या सबलीकरणाचे वर्ष २००१, प्रबोधन, प्रकाश ज्योती मार्च, २००१
- रायपूरकर, वसंत : स्त्री नेतृत्वापुढील आव्हाने, संशोधन क्षितिज, २००४

- सुमंत यशवंत : स्त्री मुक्तीची पहाट, मिळून साऱ्याजनी, फेब्रुवारी १९९९
- साठे, निर्मला : धोरणाला चळवळीचे पाठबळ पाहिजे, राजसत्तेतल्या कारभारणी, विशेषांक, २००१
- सत्तार, एस.ए. : स्त्री शिक्षण, योजना जुलै, २००७
- ठाकूर, रेखा : गांधीविचार आणि स्त्री प्रश्न, समाज प्रबोधन पत्रिका, एप्रिल, जून १९९९
- गांधी का ग्राम स्वराज्य एंव पंचायती राज, कुरुक्षेत्र, ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली.


**वृत्तपत्र लेख : (News Paper Articles)**


- न्या. धर्माधिकारी, चंद्रशेखर : दादांचे स्त्री विषयक विचार, लोकमत, १७.१.२००५
- न्या. धर्माधिकारी, चंद्रशेखर : अद्याप लढा संपलेला नाही? लोकमत, रविवार ६ मे २००७
- गेडाम, शंकरराव : स्त्रियांचा स्वातंत्र्य संग्रामातील सहभाग, तरुण भारत ६ मार्च २००६
- कुळकर्णी, आशा : संघटित स्त्री शक्तीचा अविष्कार, तरुण भारत, १२.१२.२००२
- कुळकर्णी (बोधी), रुपा : विदर्भातील १२ वर्षातील स्त्री चळवळ, लोकसत्ता, शुक्रवार ९ एप्रिल २००४
- राठोड, भरत : देशाच्या प्रगतीसाठी महिला सक्षमीकरण, नवराष्ट्र, बुधवार ८ मार्च २००६
- सामंत, मंगला : स्त्री मुक्तीचा उद्रेक, चतुरंग, लोकसत्ता, शनिवार, २ एप्रील २००५
- वैद्य, मा. गो. : स्त्री शक्तीचा आविष्कार, तरुण भारत १२.१२.२००३
- गवाणकर रोहिणी : ४२ च्या राजबंदिती, लोकमत, शनिवार, १३ ऑगस्ट २०११


**वृत्तपत्रे**


- केसरी, जाने १९३०
- जागरण उमाशंकर शुक्ल (संपा) ४ जाने. व ११ फे. १९८६
- तरुण भारत ९.८. १९८७, १०/०१/१९९०
- भारत ज्योती २८ मार्च १९४३
- महाराष्ट्र गो.अ.ओगले (संपा) १९२० ते १९४६
- लोकमत जवाहरलाल दर्डा (संपा) २८ डिसें. १९८६, ९ ऑगस्ट १९८७, २३ ऑगस्ट १९८७, १४ ऑगस्ट १९८८, १९ ऑक्टों १९८८

- हरिजन सेवक (साप्ताहिक ) प्यारेलाल (संपा)
- हरिजन सेवक (साप्ताहिक) वियोग हरी ता. २० जाने. १९४०
- हरिजन मराठी साप्ताहिक, महादेवभाई देसाई (संपा)
- हरिजन गोपाळ काळे (संपा) ता. १९ जुलै १९४२
- श्रीगुरुदेव (मासिक ) ऑगस्ट, सप्टेंबर १९८८ गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज, आश्रम सर्वोदय वर्ष ४ ऑगस्ट १९४१

**Internent / Websites**

www.wiego.org

www.nr.cw.nic.in

www.unu.edu

www.azadindia.org

www.empowerinfo.com

www.bdiusa.org

www.en.maharashtra.gov.in

www.mahilaraj.info

www.carrdindia.org

www.the hindubusinessline.com